
बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २७ | बुधवार,दि.०८ जुन २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# खातेवाटपावरून जि.प.ची पहिलीच सभा स्थगित



**गोंदिया**–कोरोना संक्रमणामुळे जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपला असताना देखील निवडणूक घेता आली नाही. परिणाम दोन वर्षे जिल्हा परिषदेत अधिकारी राज सुरूहोता. डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात निवडणूक झाली. १० मे रोजी अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड झाली. सभापतींची पदे देखील जाहीर झाली.७ जून मंगळवारला खातेवाटपासह विषय समितीच्या मुद्यावर अध्यक्षांनी विशेष सर्वसाधारण सभा बोलावली होती.मात्र ही सभाच ऐनवेळेवर स्थगित करण्यात आली.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच अध्यक्ष,उपाध्यक्ष व सभापती निवडणुकीनंतरची विशेष सर्वसाधारण सभा बैठकीच्याच दिवशी स्थगित करण्याची घटना घडली.

या सभेत सभापतींचे खातेवाटप आणि स्थायी समिती सदस्यांची निवड होणार होती. मात्र खातेवाटप आणि स्थायी समिती सदस्यांकरिता असलेला दबावाचा तिढा बैठक सुरु होण्याचा काही वेळेपर्यंत न सुटल्याने अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी ऐनवेळी सभा रद्द केली.त्यांनी ऐनवेळेवर दोनवर्षानंतर होऊ घातलेली पहिलीच सभा रद्द केल्याने जिल्हा परिषद कायद्याबद्दल असलेल्या माहितीचा अभावाने राजकीय कारकिर्दीवर मात्र ठपका लागला.

जिल्हा परिषद म्हणजे जिल्ह्याचे मिनी मंत्रालयच. या सभागृहात जिल्ह्यातील विकासकामांची रुपरेषा आणि त्यांना पूर्णरूप देण्याचे काम करण्यात येते. मात्र गेल्या दोन वर्षांपासून कोरोना संक्रमणामुळे प्रशासक राज असल्यामुळे ही संस्था दिशाहीन झाली होती. कोरोनाचे सावट दूर झाल्याने निवडणूक पार पडली. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड देखील झाली. चार सभापती देखील निवडण्यात आले. मात्र अद्याप त्यांना खातेवाटप झाले नाही. भाजपकडे अपक्षांना घेवून सत्तेसाठी असलेले आकडे असताना देखील त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस आणि आमदार विनोद अग्रवाल यांच्या चाबी संघटनेच्या सदस्यांना घेवून सत्ता स्थापन केली.

जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच काँग्रेस पक्षाला सत्तेपासून दूर राहावे लागले. सत्तेत आता मुख्यत्वे दोन पक्ष आणि एक संघटना असे तिघांची आघाडी आहे. त्यातही भाजपमध्ये दोन गट सक्रीय आहेत. त्यामुळे ताळमेळ साधताना सत्ताधारी मंडळीला तारेवरची कसरत करावी लागत आहे.

आज मंगळवारी अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी सभा बोलावली होती. या सभेत सभापतींना खातेवाटप आणि स्थायी समिती सदस्यांची निवड होणार होती.त्यातच अपक्ष म्हणून निवडून आलेले व सभापती झालेले सोनू कुथे यांनी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसने बांधकाम व अर्थ या विभागाचा हट्ट धरला असतानाच माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी आपल्या गटातील एका सभापतीला अर्थ व बांधकाम खाते देण्याचा आग्रह धरला.

मात्र अध्यक्ष त्या सभापतीला ते पद देण्यास इच्छुक नसल्याचे बोलले जात आहे.तीच परिस्थिती स्थायी समिती सदस्यांच्या निवडीत देखील समोर आली. हा तिढा सुटला नसल्याने ही सभा शेवटी अध्यक्षांनी ऐनवेळी स्थगित केल्याची चर्चा आहे. अध्यक्ष पंकज रहांगडाले पहिल्यांदाच सक्रीय राजकारणात आले. त्यांना अध्यक्षपद देखील मिळाले. मात्र राजकीय डावपेचात ते तरबेज नसल्याने आणि भाजपमधील दुसरा गट हावी होत असल्याचे यानिमित्ताने पुढे आले आहे. स्थगित करण्यात आलेली सभा यापुढे केव्हा होणार आहे, हे अद्याप जाहीर केले नाही. सत्ताकारणाचा फटका मात्र जिल्ह्याच्या विकासाला बसत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान भाजपच्या अनेक सदस्यांनी आजच्या प्रकारावर नाराजी व्यक्त व्यक्त केली.

दरम्यान काँग्रेसचे जिल्हा परिषद गटनेते संदिप भाटिया,जि.प.सदस्य जितेंद्र कटरे,उषा मेंढे यांनी बैठक स्थगित केल्याच्या मुद्यावर जि.प.अध्यक्षांजवळ आक्षेप नोंदवला असता त्यावर अध्यक्षांनी यापुढे असे होणार नाही असे म्हटल्याचे जि.प.सदस्य कटरे यांनी सांगितले.

तर सत्तेत सहभागी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका वरिष्ठ सदस्यांने जिल्हा परिषद अधिनियमाचा हवाला देत बैठक वेळेवर स्थगित करता येत नाही,तसेच एक महिन्याच्या आत खातेवाटप व विषय समित्यांचे वाटप होणे आवश्यक असल्याचे जि.प.अध्यक्षांना सांगितल्यानंतही अध्यक्ष बैठक स्थगित करण्यावर ठाम राहिल्याचे समोर आले.

# मतदार यादीवरुन ओळख होणार ओबीसींची

**नागपूर:**– ओबीसींचे राजकीय आरक्षण कायम करण्यासाठी राज्य सरकारकडून शथीचे प्रयत्न सुरू आहे. इंम्पेरिकल डेटा गोळा करण्यासाठी मतदार यादीची मदत घेण्यात येत आहे. नावावरूनच मतदार ओबीसी आहे किंवा नाही याचा तर्क प्रशासनाकडून लावण्यात येणार आहे. या आधारे ओबीसी मतदारांची टक्केवारी निश्चित केली जाणार आहे.

ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून काही निकष घालून देण्यात आले आहेत. हे निकष पूर्ण करण्यासाठी सरकारची धावपळ सुरू आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाशिवाय निवडणुका होणार नसल्याचा पवित्रा सरकारने घेतला होता. राज्य सरकारकडून सादर करण्यात आलेला अहवाल सर्वोच्च न्यायालयाकडून फेटाळून लावल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू केली. ओबीसींचा इंम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम समर्पित आयोगाच्या माध्यमातून सुरूकरण्यात आले. त्यासाठी नुकतेच आयोगाने राज्यभर विभागस्तरावर ओबीसी संघटनांची मते जाणून घेतली.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मध्यप्रदेश सरकारने सादर अहवाल मान्य करीत त्यांचे ओबीसी आरक्षण कायम केले. त्याच धर्तीवर आता सरकारकडून माहिती गोळा करण्यात येते. मध्यप्रदेश सरकारने मतदारयादीच्या आधारे ओबीसींची संख्या सादर केली होती. त्यामुळे महाराष्ट्र सरकारही मतदार यादीमधील ओबीसींची संख्या लक्षात घेणार आहे. अभिलेख, अहवाल व इतर उपलब्ध माहितीचाही आधार घेण्यात येणार आहे. ही माहिती १० जूनपर्यंत सादर करायची आहे. यादीतील नावावरून संबंधित मतदार ओबीसी आहे किंवा नाही हे निश्चित करण्यात येणार आहे.

## संशयित व्यक्तींची प्रत्यक्ष भेट

**नावावरून ओबीसी असल्याचा संशय निर्माण झाल्यास त्याच्या घरी भेट देऊन माहिती घ्यावी लागणार आहे. जातीच्या माहितीच्या आधारे संबंधित घरातील मतदार संख्या ही ओबीसी वर्गात टाकण्यात येईल. मतदार यादीत मृत व्यक्तींचाही समावेश असल्यास मोठी अडचण होणार असल्याचे सांगण्यात येते.**

## २५ जानेवारीची मतदार यादी

**हा आकडा गोळा करण्यासाठी २५ जानेवारीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून समजते. नागपूर जिल्ह्यात जवळपास २० लाख मतदार आहेत. शहरात ही संख्या २४ लाखांच्या घरात असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अशी गोळा करणार माहिती जिल्हा, तालुका व ग्राम पंचायतच नाव. ग्राम पंचायतीमधील एकूण मतदार संख्या व नागरिकांच्या मागास प्रवर्गातील (ओबीसी) मतदारांची संख्या, असा अहवाल गोळा करून शासनास सादर करायचा आहे.**




# धानखरेदी केंद्रात सावळागोंधळ

## – माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केली पाहणी



**गोंदिया :** धान खरेदी केंद्रावरील सावळागोंधळ व शेतकऱ्यांना होत असलेल्या समस्या लक्षात घेत माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी सौंदड येथील सहकारी भात गिरणी केंद्राला ७ जून रोजी भेट देवून पाहणी केली. यावेळी सदर केंद्र ४ जूनला सुरू झाल्याचे समजून आले. दरम्यान कोणत्याही शेतकऱ्यांना पावती न दिल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान धानखरेदी केंद्र त्वरित सुरूकरण्यात यावी, या प्रमुख मागणीसह केंद्रावरील इतर समस्यांना घेवून माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी सडक अर्जुनी येथील कार्यालयात जिल्हा मार्केटिंग अधिकारी वाजपेयी यांच्याशी आज (ता.७) चर्चा केली. यावेळी त्यांनी सांगितले की, दरवर्षी १ ते ५ मे पर्यंत जिल्ह्यातील सर्वच केंद्र सुरू होतात. मात्र यावर्षी महिना उलटूनही अद्यापही धानखरेदी केंद्र सुरू झालेले नाही. सडक अर्जुनी तालुक्यात फक्त ३ केंद्र सुरूझालेली आहेत. यात सौंदड, पांढरी व धानोरी या गावातील केंद्राचा समावेश आहे. त्यातही या केंद्रावर अत्यल्प धानखरेदी झाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली.

केंद्रावर शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे ४०.६ किलो मोजणीची तरतूद असताना ४१.५ किलो धान मोजणी केले जात असल्याचे दिसून आले. या संदर्भात कर्मचाऱ्याला विचारले असता संस्थेच्या अध्यक्षाचे आदेश असल्याचे कर्मचाऱ्याने मान्य केले. तसेच शेतकऱ्यांची असभ्यपणे वागणे, वेळेवर ऑनलाईन न केल्याने धान उघड्यावर पडून राहिल्याचे दिसून आले. हमालीचा दर शासकीय दराप्रमाणे १० रूपये असताना याशिवाय प्रति पोते अतिरिक्त १५ रूपये घेत असल्याचा प्रकार समोर आला. तसेच शेतकऱ्यांना डावलून व्यापाऱ्यांचे धान प्राधान्याने घेत असल्याची तक्रार माजी मंत्री बडोले यांच्याकडे करण्यात आली. यावर बडोले यांनी जिल्ह्यातील केंद्रांवर सुरूअसलेला सावळागोंधळ थांबवून शेतकऱ्यांची लुबाडणूक होणार नाही. यासाठी मार्केटिंग अधिकाऱ्याने लक्ष द्यावे, अन्यथा शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करणार, असा इशारा दिला.

यावेळी माजी मंत्री राजकुमार बडोल,तालुकाध्यक्ष अशोक लंजे, पं.स.सभापती संगीता खोब्रागडे, उपसभापती शालिंदर कापगते, जि.प.सदस्य भुमेश्वर पटले, कविता रंगारी, निशा तोडासे, गिरधारी हत्तीमारे, छाया चव्हाण, शिशिर येडे, हर्ष मोदी उपस्थित होते.

## गोंदियाचे तापमान ४६.२

**गोंदिया:** अनेक दिवसांपासून तीव्र उन्हाच्या झळा सहन करीत पावसाची प्रतीक्षा करीत असलेल्या नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळण्याची चिन्हे दिसत नाहीत. जूनचा पहिला आठवडा संपत चालला तरी सूर्याचा प्रकोप कमी व्हायला तयार नाही.उन्हाच्या झळांनी चांगलेच होरपळले गेले. ६ जून रोजी ४६.२ अंश सह गोंदिया मध्ये जून महिन्यात शतकातील सर्वाधिक तापमान ठरले.गोंदियाचे तापमान १ जून रोजी ४४.८ तर ७ जून रोजी ४५.८ अंश सेल्सीयस तर अंश असे राहिले आहे.विदर्भकरांना यावर्षी मार्चपासूनच उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे.एप्रिल,मे मध्ये विदर्भातील पाच शहरे उष्णतेच्या जागतिक क्रमवारीत पोहोचले. नुकताच केरळमध्ये मान्सून दाखल झाला व तो लवकर महाराष्ट्र व विदर्भात येईल, अशी अपेक्षा होती.

### तरुणीचा विनयभंग करणारा ढोंगीबाबाला अटक

**गोंदिया–** कालसर्प असल्याने त्याची पूजा करून देतो असे सांगून २१ वर्षीय तरुणीचा विनयभंग व अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तिरोडा पोलिसांनी ढोंगीबाबाला अटक केली आहे.दिगांबर राजेंद्रप्रसाद तिवारी (७२, रा. एकोडी) असे त्या ढोंगीबाबाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, तरुणीची प्रकृती मागील २ महिन्यांपासून बरी नसल्याने आईवडिलांनी तिला दिगांबर तिवारी याच्याकडे नेले होते. यावर तिवारीने तरुणीला कालसर्प असून ते बरे करून देण्यासाठी पूजा करावी लागणार असे सांगितले.

# रेल्वे पूलाखालील ५० कुटुंबे उघड्यावर



**गोंदिया :** शहरातील मुख्य मार्गावरील रेल्वे पुलाखाली जवळपास ५० कुटुंब गेल्या ५० वर्षांपासून घरे बांधून राहत होती. जुन्या उड्डाणपुलाची मुदत संपल्याने ते पाडण्याचे काम आता सुरू असून यामुळे मात्र या पुलाखाली राहणाऱ्या ५० कुटुंबीयांच्या घरातील सामान पोलीस संरक्षणात बाहेर काढून त्यांचे घर बुलडोझरने पाडण्यात आले.त्यामुळे त्यांना आता आपल्या मुलाबाळासह उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. यादरम्यान जुन्या पुलाखाली तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. आक्रमक झालेल्या बेघर कुटुंबीयांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या बंगल्यात ठिय्या मांडण्याचा निर्धार केला आहे.

शहरातील जुन्या उड्डाणपुलाच्या खाली भांडे, कपडे धुणे आणि साफ सफाई करण्याचे काम करणाऱ्या मजुरांचे सुमारे ५० कुटुंबीय गेल्या ५० ते ६० वर्षांपासून वास्तव करीत आहे; मात्र जुन्या पुलाला पाडण्याचे काम सुरू असल्याने त्यांची घरे हटविण्याची गरज आहे. अशात रविवारी (दि.५) त्यांच्या घरांवर बुलडोझर चालविण्यात आला. अचानकपणे कुटुंबांवर बेघर होऊन रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. आजपर्यंत या कुटुंबांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला. आता आम्ही कुठे जाऊ अशी आर्त हाक लहान मुलांपासून वयस्क महिला करीत आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा असूनसुद्धा आज या कुटुंबावर उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. शासनाने त्यांना बेघर केले; मात्र आता या कुटुंबांना निवाऱ्याची सोय होणार की नाही, हे सर्व कुटुंब जाणार कुठे? हा प्रश्न आहे. त्यांचे पुनर्वसन करण्याची मागणी होत आहे.

# ओबीसी खात्याला IASअधिकाऱ्याचे "वावडे'!

**गोंदिया :** ओबीसी, व्हीजे, एनटी आणि एसबीसी प्रवर्गाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाकरिता विविध कल्याणकारी योजना राबवण्यासाठी निर्माण झालेल्या इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाला (ओबीसी) भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याचे "वावडे' आहे. या खात्याचे संचालकपद सनदी अधिकारी अर्थात आयएएस दर्जाचे असले तरी, त्याचा अतिरिक्त कार्यभार सातत्याने गैरसनदी अधिकाऱ्याकडे दिला जात आहे. तिसऱ्यांदा अशाप्रकारची नियुक्ती करण्यात आली आहे.

या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, याकरिता ९ मार्च, २०१७ रोजी या खात्याची निर्मिती झाली. परंतु, त्यासाठी आवश्यक अधिकारी, कर्मचारी या खात्याला अद्यापही मिळाले नाही. खात्याच्या संचालकपदावर मजीतील अधिकारी असावा म्हणून या पदाचा अतिरिक्त कार्यभार उपसचिव, अतिरिक्त आयुक्त, उपसचिव यांच्याकडे सोपवला जात आहे.

संचालक दिलीप हळदे आजारी असल्याने उपसचिव गावडे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. हळदे निवृत्त झाल्यानंतर समाजकल्याण विभागाचे अतिरिक्त आयुक्त डी.डी. डोके यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला. त्यांच्याविरोधात काही कर्मचाऱ्यांनी तक्रारी केल्यानंतर इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसचिव सिद्धार्थ झाल्टे यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला.

झाल्टे यांना त्यांच्या उपसचिवपदाच्या नियमित कार्यभारासह ओबीसी संचालकपदाचा कार्यभारही सांभाळायचा आहे. सनदी अधिकारी अभिमन्यू काळे यांची बदली इतर मागासवर्ग बहुजन कल्याण खात्याच्या संचालकपदी करण्यात आली. आधीचे संचालक दिलीप हळदे हे ३१ मार्च २०२२ ला सेवानिवृत्त झाले.परंतु काळे रूजू झाले नाहीत. अशाप्रकारे ओबीसी विभागाचे संचालकपद गैरसनदी अधिकाऱ्याकडे सोपवून या पदाचे अवमूल्यन केल्या जात आहे

# त्या राखीव जागेवर उत्खननाचा घाट




**गोंदिया:** आमगाव तालुक्यातील मानेगाव येथे चराईसाठी राखीव असलेल्या भुखंडावर प्रभारी ग्रामसेवकाने ग्रामसभेतच खान उत्खननाची मंजूरी एका खाजगी कंपनीला दिल्याची माहिती दिली. या प्रकरणात प्रभारी सरपंचासह संयुक्त वन व्यवस्थापन समितीला गोवण्याचा काम ग्रामसेवक करित सून ग्रामसेवकाच्या मनमर्जी कारभाराने ग्रामवासी त्रस्त झाले आहेत. तर दुसरीकडे १७ मे रोजीच्या ग्रामसभेत उत्खनानासाठी जमिनी देण्यात येऊ नये, असा ठराव पारित करण्यात आला आहे.

तालुक्यातील मानेगाव येथे असलेला भुखंड आजघडीला वादाचा ठरत आहे. मानेगाव ते ठाणा या रस्त्याच्या दोन्ही बाजूला गट क्र.५३३ व ५६८ मिळून १७.५६ हे.आर.वन जमीन व पहाडी आहे. विशेष म्हणजे ती वन जमीन चराई व इमारती लाकडासाठी राखीव आहे. तसेच संरक्षित वन विभाग यांचे आदेश आहे. या क्षेत्रात काळवीट, चितळ, सांबर, निलगाय, पक्ष्यांचा निरंतर सहवास असतो. यामुळे सोनी–मानेगाव–ठाणा येथील ५ मामा तलावांना पाणीही उपलब्ध होता. या पहाडीवर लोह खनिज मोठ्या प्रमाणात आहे. याचाच लाभ घेत ती जमीन नागपूर येथील निको जायस्वाल कंपनीला वळती करण्याचा प्रयत्न होत आहे.

गावातील जनतेवर दबाव टाकून फेब्रुवारी ते मे २०२२ या कालावधीत नाहरकत प्रमाणपत्र देण्याचेही प्रयत्न झाले. विशेष म्हणजे सन २००७–०८ पासून गावात वन व्यवस्थापन समिती गठित आहे. परंतु संबंधित ग्रामसेवकाने पुर्वीच्या पदाधिकाऱ्यांच्या नावे वन हक्क समिती गठित करुन त्याचाही ठराव ग्रामसभेत मांडण्याचा प्रयत्न केला. गावातील माधवराव मेश्राम यांच्या ०.५६ हेक्टर आर. जमिनीवर वनहक्क असल्याचा दावा प्रमाणपत्रात आहे. व २००८ मध्ये सरपंच व वन हक्क समितीचे अध्यक्ष यांनी तो दिलेला आहे. मात्र आज तो सरपंच व वन हक्क समितीचे अध्यक्ष याला विरोध करीत आहेत. त्याच १७ मे रोजी झालेल्या ग्रामसभेत लोह खनिज उत्खनानासाठी जमीन देवू नये, असा ठराव पारित करण्यात आला. यापुर्वी गावातील माजी सरपंच व पं.स.सदस्यांनी या कंपनीकडून ना हरकत प्रमाणपत्राच्या नावावर पैसे उकडले आहेत. अशी चर्चा गावात सुरु आहे. त्यांच्या कारभारातच भोंगळ कारभार झाला आहे. तर दुसरीकडे ग्रामसेवकही ग्रामस्थांची दिशाभूल करीत आहे. तेव्हा जिल्हा प्रशासनाने या प्रकरणात लक्ष घालून नागरिकांना न्याय द्या, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# खरेदीच्या मर्यादेत मोजकीच वाढ,२० लाख क्विंटल धान व्यापाऱ्याला विकावे लागणार

**गोंदिया** : रब्बी हंगामातील धान खरेदीच्या मर्यादेत शासनाने पुन्हा मोजकीच वाढ करून राज्यातील ९ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. मर्यादेत मोजकीच वाढ करायची होती तर ती केलीच कशाला, असा सवाल करीत ही तर शेतकऱ्यांची थट्टाच असल्याचा संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

केंद्र शासनाने यंदा राज्याला रब्बी हंगामात धान खरेदीसाठी ११ लाख क्विंटलची मर्यादा ठरवून दिली होती; पण प्रत्यक्ष उत्पादनाच्या तुलनेत ही मर्यादा फारच अल्प असल्याने यावर आरोप–प्रत्यारोप सर्वच राजकीय पक्षानी केले. त्यानंतर ३ जून रोजी केंद्र सरकारने राज्यातील ९ धान उत्पादक जिल्ह्यांसाठी ९ लाख ५० हजार क्विंटलने मर्यादा वाढवून दिली आहे. मात्र, मर्यादेत मोजकीच वाढ केल्याने २० लाख क्विंटल धान खासगी व्यापाऱ्यांना कमी दराने विकावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



गोंदिया जिल्ह्याला रब्बीसाठी पूर्वी ४ लाख ७९ हजार क्विंटल धान खरेदीची मर्यादा ठरवून दिली होती. तर ३ जून २२ च्या नवीन मंजुरीनुसार आता ही मर्यादा ९ लाख १२ हजार ४६८ क्विंटल झाली आहे. म्हणजे जवळपास साडेचार लाख क्विंटलने वाढ झाली आहे; पण रब्बी हंगामात जिल्ह्यात ६८ हजार हेक्टरवर रब्बीची लागवड करण्यात आली होती. कृषी विभागाने काढलेल्या उत्पादनाच्या नजरअंदाज आकडेवारीवरून हेक्टरी सरासरी ४३ क्विंटलचे उत्पादन झाले असून, ३० लाख क्विंटल धानाचे उत्पादन होणार आहे.

धानाची विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या ऑनलाइन पोर्टलवर ७४ हजार ४७३ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे; पण केंद्र शासनाने धान खरेदीच्या मर्यादेत मोजकीच वाढ केल्याने ३५ हजारांवर शेतकऱ्यांना कमी दराने खासगी व्यापाऱ्यांना जवळपास २० लाख क्विंटल धान विक्री करावा लागणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष आहे.

## शासन दलालांवर खूश, शेतकऱ्यांवर नाराज

**शेतकऱ्यांच्या हातात धान येण्याच्या अगोदरच शासनाने कृषी केंद्र उघडायला हवे. परंतु, शेतकऱ्यांचे धान कृषी केंद्रावर येऊनही शासन धान खरेदी केंद्र सुरू करीत नाही. त्यामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याला नाइलाजाने धान व्यापाऱ्याला विकावे लागते. या शासनाच्या नीतीमुळे दलालांना मोठा फायदा, तर शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला जातो.**

## मग शासकीय धान खरेदीच बंद करून टाका

**खरीप हंगामाला सुरुवात झाली तरी रब्बीतील धान खरेदीचा तिढा सुटलेला नाही. केंद्र सरकारने धान खरेदीच्या मर्यादेत मोजकीच वाढ करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. अजूनही अनेक धान खरेदी केंद्रांवर खरेदीला सुरुवात झालेली नाही. केंद्रावरही शेतकऱ्यांची लूट कायम आहे. अशी स्थिती ठेवायची आहे तर शासनाने शासकीय धान खरेदी केंद्रे कायमसाठी बंद करून टाकावी, अशा शब्दांत जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.**

## लागवड क्षेत्र, उत्पादन ठाऊक असतानाही मर्यादा का?

**कोणत्या जिल्ह्यात किती हेक्टरवर रब्बीची लागवड करण्यात आली, यातून किती उत्पादन होणार हेसुध्दा कृषी विभागाने केंद्र व राज्य शासनाला आधीच कळविले आहे. मग यानंतरही धान खरेदीला मर्यादा ठरवून देत शेतकऱ्यांची कोंडी करण्याचा हेतू काय, हे मात्र शेतकऱ्यांच्या समजण्यापलीकडे आहे.**

## बोनसअभावी शेतकरी संकटात

**मागच्या वर्षी धानाला बोनससह २५०० रुपये क्विंटलमागे भाव पडला. परंतु, यंदा फक्त १९,६०० रुपये भाव दिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे धान उत्पादन करणारा शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. गोंदिया जिल्ह्यात धान खरेदी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाकडून केली जाते. महामंडळाच्या धान विक्री केंद्रावर या वर्षी प्रतिक्विंटल १९६० रुपये याप्रमाणे धान खरेदी झाली. परंतु, गेल्या वर्षी दिलेला प्रतिक्विंटल ७०० रुपये बोनस या वर्षी बंद करण्यात आल्याने धानविक्रीतून शेतकऱ्यांचे 'मालामाल' होण्याचे स्वप्न धुळीस मिळाले आहे. शेतमालाला न मिळणारे दर आणि वाढती मजूर टंचाई डोकेदुखी ठरू लागली आहे. एका क्विंटलमागे ६०० रुपयांचे नुकसान झाले आहे.**

## त्या खरेदी केंद्राची तपासणी करा

**जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या धान खरेदी केंद्रावर सावळा गोंधळ कायम आहे. काही केंद्रावर खरेदी न करताना मर्यादा पूर्ण झाल्याचे सांगितले जात आहे. तर अद्यापही २५ टक्के शेतकऱ्यांनी धानाची विक्री केलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असून जिल्हाधिकाऱ्यांनी या केंद्राना भेट देवून तपासणी करावी अशी मागणी होत आहे.**

## शेतकऱ्यांना आर्थिक चणचण

**या वर्षी मोठ्या प्रमाणात धानपिकाची लागवड होणार आहे. परंतु, रब्बी पिकाचे धान मार्केटिंग फेडरेशनने व आदिवासी विकास महामंडळाकडून खरेदी केले नाही. त्यामुळे हातात पैसे नाही. खरिपाचा हंगाम येऊन ठेपला असताना शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.**

**संजय टेंभरे सभापती जि.प.गोंदिया**

## संपादकीय

### राज्यसभा निवडणूक ठरवणार मविआचे भविष्य

राज्यसभेच्या सत्तावन्न जागांसाठी पंधरा राज्यांतून निवडणूक होत आहे. पैकी एकेचाळीस जागांवर निवडणूक बिनविरोध झाली असून पी. चिदंबरम यांच्यासह अन्य उमेदवार राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून आले आहेत. पण महाराष्ट्रासारख्या पुरोगामी व स्वतःला नंबर एक समजल्या जाणाऱ्या राज्यात मात्र महाविकास आघाडी सरकारला बिनविरोध निवडणूक घडविणे शक्य झाले नाही.ही निवडणुक महाविकास आघाडीचे भवितव्य ठरवणारी ठरणार आहे.वास्तविक ज्या अपक्षांनी सरकारस्थापनेत साथ दिली तेच आता विचार करु असे बोलू लागले तर सत्तेतील सहभागी मंत्री बच्चू कडू यांनी तर शेवटच्या वेळेवर निर्णय घेणार असा दिलेला सल्ला हा मविआकरीता चिंतनाचा विषय ठरला आहे.त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसचे दोनमंत्री जे तुरुंगात आहे,त्यांच्या मतदानाचे काय हा सुध्दा प्रश्न निर्माण झाला असून ही दोन मते सध्यातरी आघाडीच्या गणिताबाहेरच म्हणावे लागणार आहे.

सत्ताधारी पक्षांची इच्छाशक्ती असती तर महाराष्ट्रातही राज्यसभेच्या सहा जागांसाठी होणारी निवडणूक बिनविरोध झाली असती. आपल्या पक्षाचे जास्त उमेदवार निवडून आणण्याची हाव ठेवायची आणि विरोधी पक्षाच्या नावाने बोटे मोडायची असा सध्या राज्यात प्रकार बघायला मिळतो आहे. राज्यात बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी महाविकास आघाडीचे तीनही पक्षांचे नेते विधानसभेतील विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना भेटायला गेले होते. अर्थात ही भेट म्हणजे त्याचा निव्वळ फार्स होता. भाजपने आपला तिसरा उमेदवार मागे घ्यावा हे सांगण्याचा त्यांचा खटाटोप होता, पण त्याऐवजी त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना भेटून शिवसेनेने आपला दुसरा उमेदवार मागे घ्यावा असे का नाही सांगितले? विधानसभेत शिवसेनेचे अवघे पंचावन्न आमदार आहेत. त्या बळावर राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाच्या कुबड्या घेऊन शिवसेनेला राज्यसभेत आणखी एक खासदार पाठवायचा आहे. ज्यांचा टेकू घेऊन हे सरकार चालले आहे, त्या टेकचंद नेत्यांनीच शिवसेनेला माघार घ्यायला लावली असती, तर राज्यसभेची बिनविरोध निवडणूक झाली असती.

राज्यसभा निवडणुकीत भाजपने तिसरा उमेदवार उभा केला आहे. माघार घेणार नाही असा मराठी बाणा दाखवला आहे. कारण राज्यात भाजप नंबर १ चा पक्ष आहे. भाजपला माघार घ्यायला सांगून राज्यसभेत आपला आणखी एक खासदार पाठवायचा आणि तेथे जाऊन मोदी-शहांच्या विरोधात गरळ ओकायची असा डाव भाजपने उधळून लावला आहे. गेल्या अडीच वर्षांत ठाकरे सरकारने पूर्ण वेळ विधिमंडळाचे अधिवेशन घेतलेच नाही. कोरोनाची ढाल पुढे करून अधिवेशन गुंडाळायचे ही पद्धत या सरकारने अवलंबिली. विरोधी पक्षाच्या माऱ्यातून सुटका करून घेण्यासाठी ठाकरे सरकारने नेहमीच पळ काढला आहे. अधिवेशनात मतदानाला सामोर जाण्यास हे सरकार घाबरते हे राज्यातील बारा कोटी जनतेला ठाऊक आहे. सरकारकडे भक्कम बहुमत आहे मग विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक घेण्यास सरकार टाळाटाळ का करते? राज्यसभेच्या सहा जागांसाठी सात उमेदवार मैदानात आहेत. भाजपचे तीन, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक व शिवसेनेचे दोन उमेदवार रिंगणात आहेत. यापैकी एक जण पराभूत होणार हे निश्चित आहे. मग तो कोण पडणार याची उत्सुकता सर्वांना आहे. महाआघाडीचा उमेदवार पडला तर ठाकरे सरकारची नाचक्की होईल. शिवसेना किंवा काँग्रेसचा उमेदवार पडला तरी ठाकरेकडे बहुमत नाही, हा संदेश देशभर जाईल. या निवडणुकीत भाजपचे टार्गेट, काँग्रेस की शिवसेना, यावर सर्वच राजकीय पक्षांत मोठा खल चालू आहे.तर भाजप सुध्दा ईडीची भीती दाखवून काही आमदारांना राज्यसभा निवडणुकीच्यावेळी आपल्या तिसऱ्या उमेदवाराला मतदानासाठी दबावतंत्राचा वापर करणार नाही,हे सुध्दा नाकारता येत नाही.

ठाकरे सरकार सत्तेवर आल्यापासून भाजपला सूडबुद्धीने वागवत आहे. पोलीस व प्रशासकीय यंत्रणा भाजपच्या नेत्यांच्या विरोधात काम करीत आहे. पोलीस व प्रशासनाच्या बळावर भाजप नेत्यांना हैराण करणे हा एक कलमी कार्यक्रम ठाकरे सरकारने चालवला आहे असे ज्यांना वाटते त्यांनी मात्र राज्यातील भाजप वगळता इतर सर्वच पक्षांच्या नेत्यांना सीबीआय ईडीसारख्या केंद्रसरकारच्या यंत्रणा दररोज हैराण करुन त्यांना त्रास देत बसले हे सुध्दा कसे विसरले जाऊ शकते.राज्यसभेत भाजपला आपला आकडा वाढवायचा असल्याने ते सुध्दा काहीही करु शकतात हे नाकारता येत नाही

काय व्हायचे ते होईल, भाजप तिसरी जागा लढवणारच, भाजपच्या पाठीशी संख्याबळ आहे, असे फडणवीस व पाटील सांगत आहेत. त्यामुळे अपक्ष व छोट्या पक्षांकडे असलेली २९ मते कोणाकडे जाणार या विचाराने महाआघाडीचे नेते अस्वस्थ आहेत. महाआघाडीत असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या आमदारांचीच कामे होत नाहीत, त्यांच्या मतदारसंघात निधी पुरेसा मिळत नाही. तीनही पक्ष एकमेकांवर कुरघोडी करीत असतात. काँग्रेसला तर आघाडीत लिंबू टिंबू म्हणून ठेवले आहे. मग राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेच्या दुसऱ्या उमेदवाराला मते देऊन आपले काय भले होणार आहे? गरज सरो, वैद्य मरो अशी आघाडीची विशेषतः शिवसेनेची कार्यपद्धती आहे. मग हातचे सोडून शिवसेनेच्या नादी कोण लागेल, अशी मानसिकता अपक्ष आमदार व छोट्या पक्षांमध्ये दिसून येत आहे.

# जातनिहाय जनगणना अपरिहार्य!

इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाचा प्रश्न निव्वळ सर्वेक्षणातून सुटणार नाही. सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी स्थापन केलेल्या आयोगासाठीही ती क्षमतेपलीकडची बाब आहे. आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी जातनिहाय जनगणना हाच एकमेव मार्ग ठरतो.

ओदिशात फेब्रुवारी २०२२ मध्ये इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणाविना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. मध्य प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ओबीसींना, २७ टक्के आरक्षण देण्याची मागणी असताना १४ टक्के आरक्षण लागू करून निवडणूक घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने १८ मे रोजी मान्यता दिली, परंतु महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अजून प्रलंबितच आहे. राज्यात ओबीसी आरक्षणाविना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने आधीच दिले आहेत. त्याचा राज्यातील १८ हून अधिक महापालिका आणि २४ जिल्हा परिषदांच्या आगामी निवडणुकीवर गंभीर परिणाम होणार आहे. महाविकास आघाडीने, मार्च २०२२ मध्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित कायद्यांमध्ये दुरुस्ती केली. त्यात प्रभागांची फेररचना करणे, संख्या ठरवणे याचे अधिकार राज्य सरकारने स्वतःकडे घेतले. घाईघाईने केलेली ही दुरुस्ती ओबीसी आरक्षण लागू होईपर्यंत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवणीवर टाकण्यासाठी होती. या दुरुस्तीला न्यायालयात आव्हान देण्यात आले.

न्यायालयाने या दुरुस्त्यांच्या घटनात्मक वैधतेसंदर्भातील निर्णय राखून ठेवला. परंतु ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. आरक्षण रद्द करण्यात आले, कारण राज्य सरकार तिहेरी चाचणीत अपयशी ठरले होते. तिहेरी चाचणीत स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित ओबीसींच्या राजकीय मागासलेपणासंदर्भातील सांख्यिकी माहिती (इंपिरिकल डेटा) संकलित करण्यासाठी आयोग स्थापन करणे, त्याआधारे आरक्षणाचे प्रमाण ठरवणे आणि राखीव जागांचे एकूण प्रमाण ५० टक्क्यांच्या वर जाणार नाही, अशी व्यवस्था करणे अपेक्षित होते. राज्यातील ओबीसी आरक्षणाचा हा सावळा-गोंधळ पाहता जातनिहाय जनगणनेची मागणी अतिशयोक्त ठरत नाही.

ओबीसी आरक्षणाचे प्रमाण ठरवण्यासाठी, लोकसंख्येची जातनिहाय गणना करणे आवश्यक आहे. निव्वळ सर्वेक्षणातून हा प्रश्न सुटणार नाही. सर्वेक्षणात एकूण लोकसंख्येच्या एका अंशाचा/भागाचा अभ्यास केला जातो. ओबीसींची एकूण लोकसंख्या कोणतेही सर्वेक्षण मोजूच शकत नाही. त्यासाठी जनगणना हाच एकमेव मार्ग आहे. अशा प्रकारे सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी स्थापन केलेल्या आयोगाकडे जनगणना करण्याची जबाबदारी अप्रत्यक्षपणे सोपवण्यात आली. परंतु जनगणना हे अत्यंत क्लिष्ट काम आहे. तज्ज्ञ मार्गदर्शक, संसाधने, तांत्रिक ज्ञान आणि मनुष्यबळाचा अभाव असलेल्या या आयोगाला ते झेपण्यासारखे नव्हतेच. त्यांचा मागील अंतरिम अहवाल सर्वोच्च न्यायालयाने नाकारला, यात काहीच आश्चर्य नाही. त्यानंतर राज्य सरकारने माजी मुख्य सचिव बांठिया यांच्या नेतृत्वाखाली एक नवीन समर्पित आयोग स्थापन केला. सध्याचा आयोग थेट अनुभवजन्य माहिती




(इंपिरिकल डेटा) गोळा करण्याकडे लक्ष न देता नागरिकांकडून आणि सामाजिक-राजकीय संघटनांकडून निवेदने मागवून माहिती गोळा करत आहे. याची आवश्यकता नसून हा निव्वळ वेळखाऊपणा आहे. याला ओबीसी संघटनांनी विरोध दर्शविला आहे. शिवाय हा आयोग मतदारांच्या यादीचा आधार घेत आरक्षणाचे प्रमाण ठरविणार आहे. पण मतदारांच्या यादीत जातीचा रकानाच नसतो, त्यात १८ वर्षाखालील व्यक्तींची नावेही नसतात. त्यामुळे त्याआधारे ओबीसी आरक्षणाचे प्रमाण कसे ठरवले जाऊ शकते, हा मुख्य प्रश्न आहे.

मध्य प्रदेशातील आयोगाने मतदारयादीवरून ओबीसींचे प्रमाण ४८ टक्के असल्याचे सांगितले, परंतु त्यांच्या अहवालाची वैधता आणि अचूकता पुढील न्यायालयीन चौकशीसाठी खुली आहे. मध्य प्रदेशात झालेल्या वेगवान घडामोडींना तेथील ओबीसींच्या सामाजिक संघटनांनी २१ मे रोजी पुकारलेला राज्यव्यापी बंदही कारणीभूत असल्याचे दिसते. या संघटनांच्या भूमिकेचा जोरदार फटका शिवराज चौहान यांच्या नेतृत्वखालील भाजप सरकारला बसू शकला असता.

ओबीसींची जातनिहाय जनगणना करणे, ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे. जातनिहाय जगणनेच्या आधारावरच राज्य आणि केंद्र सरकार विविध कल्याणकारी धोरणे आणि योजनांची आखणी करत असते. जनगणनेत अनुसूचित जाती- जमातींची जातीनिहाय गणना केली जाते आणि विविध सामाजिक-आर्थिक निर्देशकांबद्दल माहिती गोळा करण्यात येते, परंतु १९४१ पासून या उपक्रमातून ओबीसींना वगळण्यात आले आहे. केंद्र सरकारने २०२१ च्या जनगणनेत ओबीसींची नोंद करण्यास होकार दिला होता, मात्र आता त्यास नकार दर्शविला आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणामुळे निर्माण झालेल्या गोंधळामुळे ओबीसी समाजात दिवसेंदिवस अस्वस्थता आणि असुरक्षितता वाढत आहे. असे असताना राज्यातील महाविकास आघाडी सरकार आणि विरोधी पक्षातील भाजप हे केवळ एकमेकांवर दोषरोपाचे खेळ-खेळण्यात व्यग्र आहेत.

महाविकास आघाडी सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला बगल देण्यासाठी नेहमीसारखा अध्यादेश संमत करण्याचा सोपा मार्ग स्वीकरला. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्च २०२१ च्या निर्देशांनंतर चार महिन्यांनी पहिल्या समर्पित आयोगाची स्थापना करण्यात आली आणि त्यानंतर वर्षभर ओबीसींसंदर्भात थेट अनुभवजन्य माहिती गोळा करण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यात राज्य सरकार अपयशी ठरले. यातून ओबीसींबाबत सरकार आणि विरोधकांची बेफिकीर आणि संवेदनाहीन वृत्ती दिसून येते.

असे असले तरी, सध्याच्या गोंधळासाठी केवळ राज्य सरकारला दोषी ठरवता येत नाही. स्वातंर्त्यानंतर आत्तापर्यंतच्या सर्वच केंद्र सरकारांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वगळता ओबीसी आणि इतर जातींची मोजणी करण्यास नकार दिला. २०११मध्ये काँग्रेस सरकारने पहिल्यांदा जातनिहाय जनगणनेची मागणी रडत-खडत मान्य केली आणि त्याला सामाजिक-आर्थिक आणि जाती आधारित जनगणना (सोशिओ- इकॉनॉमिक कास्ट सेन्सस- एसईसीसी) म्हटले.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १.२ अब्ज असताना एसईसीसीने अंदाजे ०.९ अब्ज व्यक्तींची माहिती गोळा केली. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे दशवार्षिक जनगणनेचा अध्यादेश गृह मंत्रालय काढते. एसईसीसीचा अध्यादेश मात्र ग्रामविकास मंत्रालयाने काढला. त्यामुळे या माहितीला जनगणना मानता येणार नाही. त्याला जनगणना म्हणणे, ही ओबीसींच्या डोळयात केलेली धूळफेक ठरेल. भाजपप्रणीत केंद्र सरकारने पुढे त्यातील चुकांचे आणि विश्वासार्हतेच्या अभावाचे कारण देत, राज्य सरकारला ही माहिती देण्यास नकार दिला आणि २०२१ मध्येही ओबीसींची जनगणना करणार नाही, हे स्पष्ट केले. जर एसईसीसीत चुका आहेत तर, त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर अनुसूचित जाती, जमाती आणि खुल्या प्रवर्गाशी, संबंधित माहिती कशी काय उपलब्ध आहे? भाजपला गेल्या दोन लोकसभा निवडणुकांत मिळालेल्या यशात ओबीसींच्या पाठिंब्याचा मोठा वाटा आहे. तरीही केंद्र सरकारला त्यांच्याविषयी अजिबात आस्था नसल्याचे दिसते.

ब्रिटिशांनी केलेल्या जनगणनेसंदर्भातील अभ्यासांतून हे स्पष्ट होते की, संसाधने, सार्वजनिक क्षेत्र आणि राजकीय शक्ती यावर उच्च मानल्या गेलेल्या जातींची मजबूत पकड होती. कनिष्ठ दर्जा दिलेल्या जातींना राजकीय प्रतिनिधित्व मिळवून देण्यात जनगणनेने महत्त्वाची भूमिका बजावली. म्हणूनच तथाकथित उच्च जातींनी जनगणनेत जात नमूद करण्यास विरोध दर्शवला. त्यामुळे भारतीय समाजात फूट पडते, असा युक्तिवाद केला. परिणामी, १९४१ पासून ओबीसी आणि उच्च जातींची नोंद बंद करण्यात आली. खेदाची बाब म्हणजे, ही स्थिती आजही जैसे थे आहे. समाजशास्त्रज्ञ सतीश देशपांडे यांनी "जातीच्या जनगणनेची भीती कुणाला?' असा महत्त्वाचा प्रश्न विचारत यामागील राजकरण अधोरेखित केले. त्यांच्या मते, भारतातील "सर्वात लाडावलेला मूठभरांचा समूह, उच्च जाती असून, ते बहुसंख्यांवरील त्यांच्या मक्तेदारीचे उघड गुपित आजही अबाधित ठेवू इच्छितात, जे जातनिहाय जनगणनेमुळे सर्वासमोर येईल.' म्हणूनच सध्याचे केंद्र सरकार करोनाचे कारण देत जातनिहाय जनगणना करण्यात टाळाटाळ करत आहे. आंध्र प्रदेश, ओदिशा, तमिळनाडू, बिहार आणि महाराष्ट्राने आपापल्या राज्याच्या विधिमंडळात जातनिहाय जनगणना करण्याचे प्रस्ताव मंजूर करुन केंद्राला पाठवले आहेत. राज्याच्या आणि देशाच्या अनुषंगाने राजकारणातील समकालीन प्रश्नांवर मात करण्यासाठी अद्ययावत पुरावे उपलब्ध करुन देणारी दशवार्षिक जातनिहाय जनगणना हाच एकमेव मार्ग आहे.

**यशवंत झगडे, सई ठाकूर**
thakur.sai@gmail.comma
pu.zagade@gmail.com

## शेतकऱ्यांनी डीएपी खताऐवजी सिंगल सुपर फास्फेट व युरीया खताचा वापर करावा- हिंदुराव चव्हाण

**गोंदिया :** जिल्ह्यात खरीप हंगामात प्रामुख्याने धान पिकांचे उत्पादन घेतले जात असते. खरीप हंगामात धान, तुर, मुंग, उडीद इत्यादी पिकांचा समावेश असतो. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरु झाली आहे. शेतकरी शेतीच्या मशागतीच्या कामात गुंतलेला आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी पिकांची वाढ आणि भरघोस उत्पादनासाठी डीएपी हेच खत योग्य असल्याचा समज शेतकऱ्यांमध्ये असतो. यामुळे डीएपी मागणीत दरवषी वाढ होत असून प्रति बॅग किमत १३५० (आ. सी.एफ) रुपयांच्यावर आलेली आहे. तर या वषी डीएपी खताचा काहीसा तुटवठा होण्याची शक्यता

नाकारता येत नाही. डीएपी खताऐवजी सिंगल सुपर फास्फेट व युरीया खताचा योग्य प्रमाणात वापर वाढवून कमीत कमी खर्चात जास्तीची अन्नद्रव्ये मिळवून भरघोस उत्पादन घ्यावे. असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण व कृषी विकास अधिकारी महेंद्र मळामे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

डीएपी एक बॅग १३५० रुपयांची येते, यात ९ किलो नत्र व २३ किलो स्फूरद असे एकूण ३१ किलों खत मिळतो. या व्यतिरिक्त १४७० रुपरयांत सिंगल सुपर फास्फेटच्या ३ बॅग घेतल्या तर यातून २० किलों युरीया, ९.२१ किलो नत्र, २४ किलो स्फुरद, १६.५ किलो गंधक, ३१.५ किलो कॅल्शियम असे एकुण ८१.२१ किलो खत प्राप्त होते. हे सर्व घटक धान पिक व इतर पिकांसाठी महत्वाचे आहेत.

सिंगल सुपर फास्फेट व युरीया सोबत वापरणे डीएपी पेक्षा चांगले होईल. कारण सिंगल सूपर फास्फेट मध्ये सल्फर व कॅल्शियम असतो व युरीया पासुन नायट्रोजनची उपलब्धता असते. या पासून धानातील कच-यांचे प्रमाण कमी होते व पिकांची वाढ सुध्दा चांगली होवुन उत्पादन चांगले होत असते. शेतकऱ्यांनी डीएपीचा आग्रह न धरता सिंगल सुपर फास्फेट आणि युरीया खताची योग्य मात्रा वापरावी. यामुळे लागवड खर्च कमी होवुन उत्पादनात वाढ करता येते असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण व कृषि विकास अधिकारी महेंद्र के. मळामे यांनी कळविले आहे.

## परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खत-बियाणे खरेदी करावे-महेंद्र मळामे

**गोंदिया :** जिल्ह्यात शेतकऱ्यांना योग्य व उत्तम गुणवत्तेचे बियाणे रासायनिक खत व कीटकनाशके खरेदी करतांना काळजी घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी परवाना धारक विक्रेत्योकडूनच खरेदी करावे. संशयास्पद अथवा बनावट निविष्ठांची विक्री होत असल्यास आपल्या नजिकच्या कृषी कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया महेंद्र मळामे यांनी केले आहे.

सध्या खरीप हंगामाची तयारी सुरूझाली आहे. शेतकरी शेतीच्या मशागतीच्या कामात गुंतलेला असून खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये याकरिता बियाणे खरेदी करतांना परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावे. सिलबंद असलेले बियाणे खरेदी करावे. खरेदी केलेल्या बियाण्याबाबत पीक, वाण, लेबल, नंबर, वैध मुदत, बियाणे किंमत,खरेदीदाराचे नांव, उत्पादकाचे नाव, तसेच पक्क्या पावतीवर विक्रेत्यांची सही, रोख अथवा उधारीची पावती घ्यावी. छापील किमतीपेक्षा जादा दराने बियाणे खरेदी करू नये. बियाणे खरेदी केल्यावर खरेदीची पावती, वेष्टन व त्यावरील व पिशवीतील थोडेसे बियाणे हंगाम संपेपर्यंत जपून ठेवावे. बियाणे दर्जा, उगवण क्षमता, भौतिक शुद्धतेबाबत शंका असल्यास कृषी विभागाच्या कार्यालयात तक्रार करावी.

## तर खऱ्या अर्थाने रयतेचे राज्यनिर्माण होणार : पंकज रहांगडाले



**गोंदिया:** रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी केलेला राज्यकारभार आहे. सामान्य गोरगरीब जनतेची कामे त्यांच्या राजकारभारात उत्तम रित्या करण्यात आली म्हणूनच त्यांना, मफ्ररयतेचा राजाफ्फ ही बिरुदावली लावण्यात आली. जिल्हा परिषद ही सुद्धा मिनी मंत्रालय असल्याने अनेक ग्रामीण भागातील सामान्य गोरगरीब जनता विविध कामासाठी येत असते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांची कामे वेळेतच पूर्ण करून खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी हातभार लावावा, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीत ६ जून रोजी शिवस्वराज्य दिनानिमित्त ध्वजपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्याना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य नरेश भांडारकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालविकास संजय गणवीर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी ही मार्गदर्शन करताना कर्मचारी यांनी वेळेचे पालन करीत कामाचा निपटारा तात्काळ करण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

## रोहयो कामावर उष्णतेने मजुरांचे बेहाल



**सडक अर्जुनी::** पंचायत समितींतर्गत येत असलेल्या सौंदड ग्रामपंचायतीने रोहया योजनेतून पांदन रस्त्याचे काम सुरू असून या कामावरील मजुरांचे उष्णतेच्या लाहीलाहीन बेहाल होत आहेत.मागील ४-५ दिवसापासून तापमान वाढ झाली असून तापमान ४५ अंशाच्यावर पोचले आहे.सदर रोहयो कामावर उष्णतेच्या बचावासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.मजुरांना उष्णतेच्या उकाड्याने असहाय खुल्या मैदानातील शेतीच्या पांदन रस्त्याचे कामावर होत आहेत.मात्र शासनाचे निर्देशानुसार ग्रामपंचायत कडून कोणतीही सुविधा नसल्याचे समोर आले आहे.

याकामावर पहिल्या दिवशी ६२७ ,तर ५ जुनला ५६६ मजूर कामावर होते.रोजगार सेवक वनमाला इरले हे सदर कामाच्या ठिकाणी प्रतिनिधीला गैरहजर असल्याचे आढळून आले. तर रोजगार सेवकांचे मदतगार सुनील डोये व वसंता विठ्ठले हे हजर होते.त्यांना विचारले असता कामावर किती महिला, पुरुष आहेत हेसुद्धा माहित नव्हते.मजूरांना पाणी, नेट मंडप व आरोग्य किटची सुविधा उपलब्ध नसल्याचेही दिसून आले.तापमानात झपाट्याने वाढ झाली असून उष्णतेने रौद्र रूप धारण केले असून नागरिकांना व मजूरांना त्रस्त करून सोडले आहे.याबाबत पं.स.चे बिडीओ वाघाये व पं.स.उपसभापती शालींदर कापगते यांना विचारले असता,रोहयो कामावर शासनाचे निर्देशानुसार ग्रामपंचायत अंतर्गत मजूरांना नेट मंडप,पिण्याचे पाण्याची सोय व मोक्यावर हजेरी पत्रक व झेरॉक्स प्रत ठेवणे आवश्यक आहे असे सांगितले. सदर रोहयो अंतर्गत पांदन रस्त्याचे कामावर मजूरांना होत असलेल्या असुविधा बाबत मोका चौकशी करण्याचे आश्वासन बिडीओ वाघाये यांनी दिले

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)



# काय,हे भारताचे नागरीक नाहीत?

वर्षानुवर्षे गावकुसाबाहेर राहणाऱ्या या वंचितिंना, त्यांच्या जागेवरून हटविण्याचा अधिकार संबंधित ग्रामपंचायती व तेथील तथाकथित सरपंच पदाधिकाऱ्यांना कुणी दिलाय! तिकडे सर्वोच्च न्यायालय म्हणते, १२ वर्षेपर्यत ज्यांचा त्या जागेवर, जमिनीवर कब्जा असेल, त्याची मालकी हक्क तिथे निर्माण होतय! आणि हे तर पिढ्यान पिढ्या, वर्षीनवर्षे तिथे राहात आहे! संबंधित जिल्हाधिकारी, तहसिलदार काय करतात! राज्यघटनेने हे नागरीकांचे, कायद्यांचे संरक्षक आहेत! मग तुम्हीही झोपा काढता! हे वाचा, काय सुरूआहे, या देशात...?

दहा वर्षापासून राहत असलेल्या वैदुन्ना दोन दिवसात वस्ती खाली करा-ग्राम पंचायतचा आदेश

इंग्रज भारतात येन्यापुर्वी काय आरोग्यावरील उपाय अस्तित्वात नव्हते कां? लोक औषधाशिवाय मरायचे कां? पुराण काळातील महायुद्धे जसे महाभारतातील कुरुक्षेत्रामधील कौरव-पांडव युद्ध, इतिहासकालीन प्लासीची लढाई, चित्तौडची लढाई, पावनखिंड युध्द इत्यादी युद्धात जी सैन्याची शारीरिक वा जीविताची हानी व्हायची, त्यावर इलाज करणारी चरक शास्त्राची विद्या अस्तित्वात होती. म्हणून जडीबूटीच्या सहाय्याने जखमी झालेल्या सैन्यावर इलाज केला जायचा, तुटलेले वा मोडलेले हात पाय जोडले जायचे। जंगलातून वनस्पति औषधी (पाने, फुले, फळे, साल, खोड, कंद, मुळे यांचा अर्क, पावडर) शोधून आणायची, अनेक रोगांवर इलाज करणारे पारंपरिक दनयान जोपासनारे वैदु आजही अस्तित्वात आहेत. जीथे दवाखाने, औषधी, इंजेक्शन वा अन्य कोणतीही आरोग्य व्यवस्था पोहोचली नाही तिथे आजही वैदु हाच हमखास ईलाजांचा एकमेव पर्याय। या दनयनाला अधिकृत करण्यासाठी शासकीय संस्था द्वारे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबवून आरोग्यसेवक म्हणून सामावून घेता आले असते. परंतु नाही, दवाखान्याच्या नांवावर ख़टीकांची पैदास झाली, हे कोरोनाच्या काळात लोकांना चांगलेच कळलेले आहे. वैदुच्या दनयनला प्रतिष्ठा नाही, पैसा नाही तरीही नवीन तंत्रदनयन अवगत करता येत नाही म्हणून पारंपरिक व्यवसाय करीत राहायचे अन जगत राहायचे, हेच तेवढे ह्यांच्या नशिबी।

दिनांक २ मे २०२२ ला संघर्ष वाहिनीच्या टीमने नागपुर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील नरसाळा गटग्रामपंचायतचे कुंभापुर गांव गाठले. वैदु या भटक्या जमातीच्या लोकांचे गांव कुसाबाहेर गांवठान जमिनीवर अतिक्रमण. गांवापासून दूर नदीच्या किनाऱ्याजवळ झुडपी जंगल. कन्हान नदीला पुर आला की हा भाग बुडित क्षेत्र म्हणून घोषित. अश्या रेड एरिया म्हणून घोषित केलेल्या जागेवर झोपडीवजा घरे. लाकडी खंबावर ताळपत्रीचे आच्छादन. भिंति नाही की दरवाजे नाही.

उन्हाळा पावसाल्यात चारही बाजूने हवा, वारा, पावसाचा बिनधास्त प्रवेश. जवळच हनुमानाचे मंदिर व पुजेसाठी पाणी व्यवस्था म्हणून विहीर. शिक्षण नाही, जमीन नाही, हक्काचे घर नाही. अनेक वेळा ग्राम पंचायत कड़े राशन कार्ड साठी अर्ज केला, वोटर कार्डची मागणी केली. मात्र कोणत्याही अर्जवर कारवाही नाही. शेतात काम असले की मजूरी करायची व शेतातील काम संपले की गांवोगांवी भटकून विविध रोगांवर इलाज करणारी औषधी विकने व त्यावर जगने. अशी ही वैदूची पंधरा कुटुम्बे, ७१ लोक. ग्राम पंचायतला भेट दिली तेव्हा आदिवासी आरक्षनातुन झालेले सरपंच श्री टेकाम, श्री राउत व एक महिला सदस्य उपस्थित होते. त्यांना विचारले की हे लोक दहा वर्षापासून राहत आहेत, तेव्हा आताच त्यांना जागा खाली करुन कां मागता? ह्या लोकांना इतके वर्षापासून राशन कार्ड कां दिले नाही? त्यावर उत्तर मिळाले, की "ह्यांनी दोन दिवसात जागा खाली करावी, नाही तर तोड़ फोड़ करुन हाकलून देवू". एकीकडे अन्न सुरक्षा कायदा २०१३ सांगतो की अतिवंचित घटकातील प्रत्येक कुटुंबाला स्वस्त धान्य दुकानातून स्वस्त दरात धान्य मिळाले पाहिजे. असे असतांना, ज्याला धान्याची नितांत गरज आहे, त्यालाच ते मिळत नाही. आरोग्य व्यवस्था बाबतीत त्यांच्यात कुटुम्ब नियोजनाचा प्रचार नाही, संस्थात्मक प्रसूति ऐवजी घरीच प्रसूति, बहुतेक महिला अनॉमिक, मुले मूली कुपोषित असतांनाही आंगनवाड़ी सेविका वा आशा वर्कर वा नर्स यांनी कोणाचीही दखल घेतली नाही. गांवकऱ्यानी अनाधिकृत वीजेचे कनेक्शन नुकतेच कापले, त्यामुळे साप, विन्चु यांचाही उपद्रव वाढला.

वय वर्षे ३ ते १८ वयोगटातील २५ बालके ही अशिक्षित आहेत. कित्येक वर्षापासून शून्य शालाबाह्य मुलांचा तालुका मौदा म्हणून मिरवनाऱ्या शिक्षण विभागाच्या सरकारी शाळेच्या हाकेच्या अंतरावर इतकी मुले शाळाबाह्य आहेत. मुजूर झालेली ही व्यवस्था शिक्षण हक्क कायद्याला आजपर्यंत वाकुल्या देत राहिली.

जिल्हा शिक्षण विभागला ही परिस्थिति संगीतल्यावर जिल्हा समन्वयक प्रसेनजीत गायकवाड़ व अन्य अधिकारी वस्तीवर पोहोचले. तेव्हा मुलांच्या नोंदी घेवून गांवातील शाळेच्या मुख्याध्यापकास सांगितले की मुलांना त्यांच्या वयोगटानुसार वर्गात प्रवेश दया. तेव्हा गांवातील नागरिकांनी विरोध करीत धमकावले की वैदुच्या मुलांना प्रवेश दिल्यास आम्ही आमची मुले शाळेतुन काढून टाकू. सहज आठवले की ११० वर्षापूर्वी डॉ बाबासाहेब आम्बेडकराणां वर्गाबाहेर बसून शिकावे लागले. अस्पृश्यता नष्ट करण्याचा कायदा अस्तित्वात आला. खरचं मनातली अस्पृश्यता नाहीसी झाली कां? वैदु ही जात तशी भटक्या जमातीमधील तरीही अस्पृश्यतेचे चटके सोसत आहेत. गांवातील विरोध करणारे सदस्य व नागरिक बहुतेक ही ओबीसी समुदायातील असूनही जातींच्या उतरंडित हे खालच्या जातीतले म्हणून तिरष्कार करीत आहेत, हे जास्त दुखदायी आहे. तीही मानसं आहेत, हे समजायला आणखी किती काळ लागेल।

ह्या घटनेची तक्रार तहसीलदारकडे केल्यानंतर दुसऱ्या दिवशी तहसीलदार यांचे कार्यालयात तक्रारदार व ग्राम पंचायत पदाधिकारी याच्यासोबत झालेल्या बैठकीत निर्णय झाला की सहा महिन्यापर्यन्त त्यांची राहण्याची व्यवस्था होइस्तोवर कोणालाही त्यांना हुसकावून लावता येणार नाही. आणि या अवधित यशवंतराव चव्हाण वसाहत योजना वा प्रधानमंत्री आवास योजना ( विमुक्त भटक्या जमातीं) मधील कोणत्याही योजनेचा लाभ घेता येईल, हा प्रयत्न व्हावा. देशयात गांव कुसाबाहेर वा शहरांच्या आउटर रिंग रोडला लागून असलेल्या मोकल्या जमिनीवर अतिक्रमण करुन राहिलेल्या बऱ्याच वस्त्याना हुसकावून लावणे, झोपडया जाळणे, पोलिसी अत्याचार, अतिक्रमण हटाव दस्ता इत्यादि प्रकारांना सामोरे जावे लागत आहे. टीममध्ये अश्विनी नागुलवार, योगिता मांचमवार, मुकुंद अडेवार, दीनानाथ वाघमारे इत्यादि सहभागी होते.

**दीनानाथ वाघमारे**
**संघर्ष वाहिनी,**
**मो.९३७०७७२७५२**

# रिसॉर्ट बांधकामाची प्रतीक्षा

### अतिक्रमणाचा विळखा

**शासनाकडून रिसॉर्ट तयार करण्यासाठी जी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यावर अतिक्रमणकाऱ्यांचे लक्ष पडले असून त्या जागेवर आता अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण करण्याला सुरुवात केली आहे. त्यामुळे रिसॉर्टसाठी प्रस्तावित जागा आता अतिक्रमणाच्या विळख्यात सापडत आहे.**

**गोंदिया:** एकीकडे पर्यटन विकासासाठी शासनाकडून कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करण्यात येत असताना दुसरीकडे संबंधित विभागाच्या दुर्लक्षीतपाचा फटका पर्यटकांसह शासनाला बसत आहे. महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाला गती मिळावी, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला लागून गोरेगाव तालुक्यातील मुरदोली परिसरात रिसॉर्ट निर्मिती करण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली असून त्यासाठी शासनाकडून निधीलाही मंजूरी देण्यात आली आहे. मात्र संबंधित विभागाच्या संथगतीने पर्यटन विकास ठप्प पडले आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन वर्षापासून रिसॉर्ट उभारण्याची कोणतीही प्रक्रिया करण्यात आली नाही. त्यामुळे पर्यटकांना खासगी किंवा पर्यटन स्थळांपासून ५० किमी अंतरावर राहावे लागत आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महमंडळामार्फत राज्यातील पर्यटनस्थळांना प्रोत्साहन दिले जाते. महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचा विकास करणे आणि येणाऱ्या पर्यटकांसाठी निवास व इतर सुविधा उपलब्ध करुन देणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. ज्यामुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळते. गोंदिया जिल्ह्यात नागझिरा, नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान, कचारगड, प्रतापगड, हाजराफॉल, नागरा प्राचीन शिवमंदिर आदी पर्यटन स्थळांचा समावेश आहे. या ठिकाणांना दरवर्षी हजारो पर्यटक भेट देतात. या पर्यटकांना पर्यटनस्थळी राहण्यासाठी सोयीसुविधा नसल्यामुळे त्यांना ५० किमी अंतरावर असलेल्या गोंदिया मुख्यालयात मुक्काम करावा लागतो. या अनुषंगाने बोदलकसा येथे सुंदर रिसॉर्टची निर्मिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने केली आहे. तिथे राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था आहे. तर याच धर्तीवर गोंदिया-कोहमारा राज्य मार्गावरील नागझिरा अभयारण्यालगत असलेल्या गोरेगाव तालुक्यातील मुरदोली येथे देखील रिसॉर्ट उभारण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी तीन वर्षापुर्वीचा कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याबरोबरच जागाही उपलब्ध करुन देण्यात आली. मात्र आजतागायत ना रिसॉर्ट झाले ना रिसॉर्ट बनवण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यामुळे पर्यटन विकासात स्वत: पर्यटन विकास महामंडळाचेच दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, याचा त्रास पर्यटकांना होत असून त्यांना खासगी हॉटेल किंवा रिसॉर्टचा आसरा घ्यावा लागत आहे. तर यामुळे शासनाचाही महसूल बूडत आहे.

पर्यटन विकास महामंडळाकडून करण्यात येत असलेली प्रक्रिया अतिशय संथ गतीने असून कामाचा वेग मंदावला तर पर्यटनाचा विकास कसा होणार असा प्रश्न आता निर्माण होत आहे. पर्यटकांची मागणी पाहता प्रशासनाने पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी व पर्यटकांना सुविधा देण्यासाठी मुरोदली येथील आरक्षीत ठिकाणी तातडीने रिसॉर्ट तयार करणे गरजेचे झाले आहे.



**मुरदोली परिसरात महाराष्ट्र पर्यटन विकासतर्फे रिसॉर्ट तयार केले जाणार आहे. यामध्ये काही तांत्रिक त्रुटी आहेत. जे दूर करुन लवकरच ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल.**

**प्रशांत सवई,**
**उपसंचालक महाराष्ट्र विकास पर्यटन महामंडळ नागपूर**

# वेळकाढू धोरणाने रखडली पदोन्नती



### पैशाकरिता त्रास

**शिक्षण विभाग, समाजकल्याण, पंचायत विभाग, आरोग्य, पशुसंवर्धन विभागात असे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे बोलले जाते. वारंवार त्रुट्या काढून पैशांकरिता प्रकरण रेंगाळत ठेवण्यात येत असल्याचा आरोप देखील कर्मचाऱ्यांकडून होत आहे.**

**गोंदिया:** सातवा वेतन आयोग लागू होण्यापुर्वी सलग १२ वर्ष एकाच पदावर नोकरी केलेल्या कर्मचाऱ्याला कालबद्ध पदोन्नती लागू करण्यात यायची. तो कालावधी आता सातव्या वेतन आयोगानंतर १० वर्ष झाला. नियमित पदोन्नती, कालबद्ध पदोन्नती करिता एक ठराविक वेळापत्रक तयार करण्याची गरज असताना जिल्हा प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यातच सातव्या वेतन आयोगानंतर यात मोठ्या संख्येने वाढ झाली आहे. कालबद्ध पदोन्नतीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली जाते. त्या समितीमध्ये सर्वच विभागाचे विभागप्रमुख हे सदस्य असतात. तर सदस्य सचिव हे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी असतात. मात्र, समितीची बैठकच झाली नसल्याने जिल्हा परिषदेंतर्गत अनेक प्रकरणे अडगळीत पडली आहेत.

सातवा वेतन आयोग लागू होऊन वर्षे लोटले, परंतु त्या वेतन आयोगानुसार आणि सलम १० वर्ष एकाच आस्थापनेवर नोकरी झालेल्या कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती लागू करण्यात येते. परंतु गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह प्रशासनाला कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण निकाली काढण्यास वर्ष लागत असल्याने प्रशासन कासवाच्या गतीने चालल्याचे बघावयास मिळत आहे. गेल्या सहा महिन्यापासून तै बैठकच कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण काढण्यासाठी घेण्यात आलेली नाही.

सामान्य प्रशासन विभागाकडे ५० ते ६० फाईल कालबद्ध पदोन्नतीसाठी अडकून पडल्या आहेत. त्याचप्रमाणे आरोग्य विभाग, कृषी विभागासह पंचायत विभागातील ग्रामसेवकांच्या कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण वर्षानुवर्षे पडून राहत असल्याने जिल्हा परिषदेचे अधिकारी हे फक्त वेळकाढू धोरण राबवून मिळालेल्या आयएसओ प्रमाणपत्रांची टिंगलटवाळी करत असल्याचा आरोप होत आहे. यासह चतुर्थ श्रेणी कर्मचारी पदोन्नतीचे प्रकरणही सामान्य प्रशासन विभागाने रेंगाळत ठेवले आहे. संबंधित विभागप्रमुखाला आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे प्रकरण तयार करुन समितीसमोर ठेवायचे असते. परंतु विभाग प्रमुखही त्याकडे कानाडोळा करत असल्याचे चित्र आहे.

# उपविभागीय कार्यालयात आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी घेतला विविध विभागाचा आढावा

**अर्जुनी मोरगाव :** आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी उपविभागीय अधिकारी तसेच दोन्ही तालुक्यातील अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेतली. अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात वन विभागाचे प्रलंबित प्रकरणात चर्चा करण्यात आली. दोन्ही तालुक्यात राजस्व गाव व वन विभागाचे किती गावी येत आहेत ज्यामुळे रस्त्यांचे काम होत नाही, दोन्ही नगरपंचायतमध्ये महसूलची जागा किती आहे, त्याचे टी.एल.आर. मार्फत सर्वेक्षण करून संयुक्त बैठक घेऊन रिकॉर्ड तयार करण्याची सूचना दिल्या. तसेच नगरपंचायतील नागरिकांना जागेच्या कायम स्वरूपाची स्थायी पट्टे देण्याची प्रक्रिया गतिशील करणे संबंधित अधिका?्यांना सूचना दिली.

याशिवाय संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेचा उत्पन्नाचा दाखला तात्काळ मिळावा व विविध अडचणी दूर व्हाव्यात, अर्जुनी/मोर विधानसभा क्षेत्रातील बहुसंख्य नागरिक कष्टारी, गोर-गरीब व निराधार असून ते संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घेतली पाहिजे. तसेच सदर लाभार्थ्यांना लवकरात लवकर योजनेचा लाभ मिळेल आणि जास्तीत जास्त नागरिकांना या योजनेचा लाभ मिळण्याकरिता प्रत्येक गावातील तहसील कार्यालयामार्फत संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे शिबीराचे आयोजन करून त्यांना लागणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता सदर शिबीरामध्ये करून गरजू लाभार्थ्यांना लाभ देण्यात



यावे. तसेच लाभार्थ्यांचे प्रकरणे तात्काळ मंजूर करण्याच्या सूचना आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी दोन्ही तहसीलदार यांना दिल्या.

तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावाच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा, ग्रामपंचायतीने प्रत्येकी २ कोटीच्या नियोजन करावा, ड यादीतील लोकांचे घरकुल अपूर्ण राहिले आहेत ते त्वरित पूर्ण करावे, गरजू लाभार्थ्यांना लाभ द्यावे, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा अंमलबजावणी करावा, असे सूचना आमदार चंद्रिकापुरे यांनी गटविकास अधिकारी यांना दिले.

त्याचप्रमाणे नवीन रेशन कार्ड आणि रेशन कार्ड धारकांना अन्नधान्य मिळत नाही याबाबतही पुरवठा अधिकारी यांच्याशी चर्चा केली. शेतकऱ्यांनी समूह पीक पद्धतीने शेती करुन उत्पादन खर्च कमी करावे तसेच उत्पादित शेतीमालाची प्रतवारी व मूल्यवर्धन करुन योग्य विक्री व्यवस्थापणेच्या माध्यमातुन अधिकचा नफा शेतकऱ्यांनी प्राप्त करावा, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. तसेच कृषि प्रकिया युनिटद्वारे शेतकऱ्यांना रोजगाराची उपलब्धता, तसेच शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे यासाठी योग्य नियोजन करण्याबाबत सूचित केले.

सदर बैठकीत उपविभागीय अधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी, अर्जुनी मोरगाव तहसीलदार विनोद मेश्राम, सडक-अर्जुनी तहसीलदार किशोर बागडे, मुख्याधिकारी नगरपंचायत अर्जुनी/मोर शिल्पा राणी जाधव, गट विकास अधिकारी विलास निमजे, श्रीकांत वाघाये, आरएफओ दुर्गे, पुरवठा अधिकारी काळे, तालुका कृषी अधिकारी लांजेवार, शहारे उपअभियंता विद्युत विभाग संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# कार्यालयांची अग्निशमन यंत्रणा रामभरोसे



### कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची गरज

**जिल्हाभरातील शासकीय कार्यालयात अग्निशमन व्यवस्थेचे कमी अधिक प्रमाणात डिझाइन झाले. प्रत्यक्षात ही यंत्रणा चालू आहे किंवा नाही याची पाहणी दर सहा महिन्यांनी होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने पाहणीच होत नाही. यामुळे फायरची यंत्रणा शोभेची वस्तू ठरली आहे. आग लागल्यास गॅस सिलींडरचा वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण ही अनेक कर्मचाऱ्यांना नाही.**

**गोंदिया:** तहान लागल्यावर विहिर खोदणे, हा प्रकार प्रशासन नेहमीच करते. मात्र आग लागल्यावर पाणी शोधणे हाही प्रकार आता केला जात आहे. ४२ अंशापर्यंत चाललेल्या तापमानामुळे इमारतीमध्ये आगी लागण्याची दाट शक्यता आहे. महत्वाचे दस्तावेज असलेल्या शासकीय कार्यालयांना तर हा धोका अधिक आहे. मात्र गोंदियातील बहुतांश कार्यालये याबाबत गाफील असल्याचे आढळून आले आहे.

कार्यालयांमध्ये लावलेल्या फायर फायटिंगचे बॉक्स शोभेपुरते आहेत. अनेक बॉक्समध्ये गॅस वाहून नेणरे पाईप नाहीत. तर काही ठिकाणी नाममात्र गॅससिलींडर लावून आहेत. विशेष म्हणजे, हे साहित्य कशासाठी आहे. याची कर्मचाऱ्यांनाच माहिती नाही. मग आग लागली तर या साहित्याचा वापर कोण करणार, हा प्रश्न आहे. अग्निशमन यंत्रणेचे डिझाज़न इमारतीला बसविण्यात आले आहे.

मात्र हे डिझाइन केवळ शोभेच्या वस्तूप्रमाणे लटकून आहे. त्यातील अत्यावश्यक साहित्य दिसेनासे झाले आहे. शासकीय कार्यालयाच्या इमारतीचे नियमित फायर ऑडिट होणे गरजेचे असूनही त्याबाबतीत उदासीनता आहे. जिल्हा परिषदेची इमारत अग्निशमनाच्या बाबतीत सर्वाधिक असुरक्षीत असल्याचे स्पष्ट झाले. या ठिकाणी आग रोखण्यासाठी फायर फायटिंगची अद्यायावत यंत्रसामुग्री नाही. वित्त विभाग, सामान्य प्रशासन, समाज कल्याण, शिक्षण, पंचायत, पाणीपुरवठा आणि इतर विभागांमध्ये आग विझविणारे सिलींडर नाहीत. जे सिलींडर आहेत ते मुदतबाह्य झाले आहेत. वर्षभरापुर्वी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाला आग लागून त्यात मोठे नुकसान झाले. हवाबंद असल्याने आग पुढे सरकली नाही. अन्यथा पूर्ण जिल्हा परिषद आगीच्या भक्ष्यस्थानी गेले असते. नगर परिषद इमारचीही अवस्था अशीच आहे. दर सहा महिन्यांनी या फयरची तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र, तपासण्या होताना कधीच दिसले नाही. यामुळे आग लागल्यास ही यंत्रणा कार्यान्वित करताना मोठी कसरत करावी लागणार आहे.


# लेखिका उषाकिरण आत्राम यांची 'मोट्यारिन' आता इंग्रजीत

**गोंदिया:-** महाराष्ट्रातील पहिली आदिवासी कवयित्री अशी नाममुद्रा लाभलेल्या उषाकिरण आत्राम यांच्या ममोट्यारिनफ या गोंडी भाषेतील पहिल्या कविता संग्रहाचा अनुवाद आता इंग्रजी भाषेत उपलब्ध झाला आहे. अमरकंटक विद्यापीठाचे (म.प्र.) प्रा.डॉ. संतोषकुमार सोनकर हे अनुवादक असून अकॅडेमिक पब्लिकेशन्स दिल्ली या प्रकाशन संस्थेने कविता संग्रह प्रकाशित केला आहे.

सदर कविता संग्रह मराठीत मम्होरकीफ या नावाने प्रसिद्ध असून हिंदीतही उपलब्ध आहे. मोट्यारिन किंवा म्होरकी या शब्दांचा अर्थ इंग्रजी भाषेत मलीडरफ असा असला तरी डॉ. सोनकर यांनी गोंडी भाषेतील 'मोट्यारिन' असाच शब्दप्रयोग केला आहे. उल्लेखनीय असे की मम्होरकीफ हा कविता संग्रह महाराष्ट्रातील बहुतेक विद्यापीठात अभ्यासला जात आहे व बरेच विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत.

इंग्रजीतील या अनुवादामुळे इंग्रजी भाषकांना सुद्धा आदिवासींची भाषा, संस्कृती, समाजजीवन व जगण्याची प्रेरणा यांचे दर्शन घडेल असा विश्वास उषाकिरण आत्राम यांनी व्यक्त केला असून डॉ. संतोषकुमार सोनकर यांचे व प्रकाशन संस्थेचे आभार मानले आहे.

तर शताली शेळमाके, बिच्चू वड्डे, नंदकिशोर नेताम, रमा टेकाम, प्रमोद ताराम, डॉ.फनीशसिंह कुसरे, रमेश कोरचा, कमलेश गोंड, डॉ. आकाश पोयाम, रमेश कासा, संध्या धुर्वे, ॲड. लालसू नागोटी,




ॲड.भरत टेकाम, डॉ.के. एम.मैत्री, राजेश मडावी, रमेश शर्मा, शशी तिवारी, परेश दुरुगवार, मिलिंद गणवीर आणि माणिक गेडाम यांनी लेखिका उषाकिरण आत्राम, अनुवादक डॉ. सोनकर व अकॅडेमिक पब्लिकेशन्सचे अभिनंदन केले आहे.

# शहरातील १२३ इमारती धोकादायक

## नगर परिषदेने केले सर्वेक्षण: मालमत्ताधारकांना बजावली नोटीस



### संबंधित व्यक्ती राहणार जबाबदार

**अशी जीर्ण इमारत पडून कुणालाही काही धोका झाल्यास संबंधित मालमत्ताधारक जवाबदार राहतो. यासाठीच नगर परिषदेने आता नगरपालिका अधिनियमांतर्गत मालमत्ताधारकांना जवाबदार धरुन नोटीस देण्यास सुरुवात केली आहे. शिवाय काही अनुचित प्रकार घडल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. असे नोटीसीतून बजावले आहे.**

### नगर परिषद बजावत आहे नोटीस

**शहरातील जीर्ण इमारतीपासून कुणालाही धोका होऊ नये यासाठी नगर परिषद अशा इमारतींचे कर विभागातील मोहरीलच्या माध्यमातून सर्वेक्षण करते. तसेच अशा मालमत्ताधारकांना नोटीस बजावून अशा जीर्ण इमारती पाडण्याबाबत कळविते. दरवर्षी अशाच प्रकारे नोटीस बजाविली जाते. मात्र मालमत्ताधारक जीर्ण इमारती पाडत नसल्याचेही दिसतगे. यंदा मात्र नगर परिषदेने जीर्ण मालमत्ता पाडा. अन्यथा त्यासाठी संबंधित व्यक्तीच जवाबदार राहील अशी नोटीस बजावली आहे.**

**गोंदिया:** नगर परिषदेचे शहरातील जीर्ण इमारतीचे सर्वेक्षण सुरु केले आहे. या सर्वेक्षणात शहरातील १२३ इमारती धोकादायक असून मालमत्ताधारकांना नोटीस बजावली आहे. आतापर्यंत नगर परिषदेने जीर्ण इमारतींची यादी तयार करुन त्यांना नोटीस बजावण्याचे काम सुरु केले आहे.

पावसाळ्यात जीर्ण इमारतींना जास्त धोका राहत असून, अशा जीर्ण इमारतीकडून कित्येकांचा जीव गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. आता पावसाळा तोंडावर आला असून पाऊस कधीही हजेरी लावू शकतो. अशात जीर्ण इमारतीपासून त्यात राहणाऱ्यांना किंवा अशा या जीर्ण इमारतींच्या परिसरातून ये-जा करणाऱ्यांना धोका होऊ शकतो. विशेष म्हणजे, शहरातही असे प्रकार घडले आहेत. आता मालमत्ताधारकांच्या हलगर्जीपणामुळे कुणाच्या जिवावर बेतू नये किंवा मालमत्तेची हानी होऊ नये, यासाठी अशा जीर्ण मालमत्ता किंवा तीचा जीर्ण भाग पाडणे गरजेचे असते.

यासाठी नगर परिषदेने शहरातील अशा जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण सुरु केले असून, जीर्ण मालमत्ताधारकांना नोटीस बजावली आहे.

आतापर्यंत नगर परिषदेने अशा १२३ जीर्ण इमारतीची यादी तयार केली असून त्यांना नोटीस बजावण्याचे काम सुरु आहे. दरवर्षी नगर परिषद मालमत्ता कर विभागाच्या माध्यमातून शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करवून घेते. त्यानुसार, मालमत्ताधारकांना नोटीस बजावण्याचे काम नगर परिषद करते. मात्र, त्यावर काही अंमलबजावणी होताना दिसत नाही. परिणामी दरवर्षी जीर्ण इमारतींची यादी तायर होते व पुढील वर्षी त्यातीलच कित्येक इमारतींचा समावेश पुन्हा होतो. मात्र, स्थिती जैसे थे च आहे. आता नगर परिषदेने पुन्हा नोटीस बजावले आहे, त्याकडे लक्ष लागले आहे.


# ग्रामपंचायत कार्यालय हिरापूर
## तालुका गोरेगाव जिल्हा गोरेगाव
## निविदा सुचना क्रमांक-०२/२०२२-२३ (पहिली वेळ)

ग्रामपंचायत हिरापूर ता.गोरेगाव जि.गोंदिया अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षात खालील विकासकामाकरिता १) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मौजा हिरापूर येथे सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे रू.३.०० लाख २) सामान्य निधी अंतर्गत मौजा संभाटोली येथे उलट्या तलावाजवळ हातपंप बनविणे रू.१.०७ लक्ष ३) ग्रामीण पाणी पुरवठा सामान्य निधी अंतर्गत टाका बांधकाम व व्हॉल्व बसविणे रू.०.४० लक्ष ४) घनकचरा व सांडापणी व्यवस्थापन अंतर्गत मौजा साईटोला येथे विविध घटकांचे बांधकाम करणे ४०४४५/- हि बांधकामे पूर्ण करण्याकरिता दोन लिफाफा पद्धतीने B१ टक्केवारी दराने ऑफलाईन निविदा मजूर सहकारी संस्था सुशिक्षीत बेरोजगार अभियंता/बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून मागविण्यात येत आहे. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निविदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालय हिरापूरचे नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे.

**निविदा वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १) निविदा प्रसिद्धी | ०७/०६/२०२२ | ५)निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे | ग्रामपंचायत हिरापूर खाते क्र. 60216991103 बँकेचे नाव.बँक ऑफ महाराष्ट्र शाखा गोरेगाव IFSC Code-MAHB0000503 या खात्यावर RTGS/NEFT/ Direct Transfer किंवा ग्रामपंचायत हिरापूर येथे रोखीने भरणा करणे. |
| २)निविदा ऑफलाईन भरणा | ०७/०६/२०२२ ते १४/०६/२०२२ पर्यंत | | |
| 3) निविदा उघडणे | ग्रा.पं.मासिक सभा | | |
| 4)निविदा भरणा पूर्व बैठक | नाही | | |

**-स्वा/- सरपंच ग्रा.पं.हिरापूर** | **-स्वा/- उपसरपंच ग्रा.पं.हिरापूर** | **-स्वा/- ग्रामसेवक ग्रा.पं.हिरापूर**



# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
## कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग गोंदिया

ई-मेल gidgondiadb@rediffmail.com दुरध्वनी क्र. ०७१८२-२३७०७७

## ई-निविदा सुचना क्र. ०१/गोपावि/२०२२-२३

Main Portal:https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता, गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया ता.जि.गोंदिया ह्यांचे कार्यालयाकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असलेल्या मजुर सहकारी संस्था जि.गोंदिया कडून निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच संपूर्ण निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित किंमत | इसारा /बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग/पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | खैरबंधा मध्यम प्रकल्पाचे धरण पाळ व कालव्यावरील जलसेतू, ड्रेनेज क्रॉसिंग ईत्यादी बांधकामाची दुरुस्तीचे काम | १८,७२,८९८/- | २०,०००/- | रू.२३६०/- (जीएसटीसह) | मजुर सहकारी संस्था जि.गोंदिया | ०८ महिणे (पावसाळा धरुन) |

अ) ई-निविदा विक्रीचा दिनांक :-दि.०६/०६/२०२२ ते २०/०६/२०२२ वेळ सायं.५.७५ वाजेपर्यंत

ब) ई-निविदा सादर करण्याचा शेवटचा दिनांक :-दि.२०/०६/२०२२ वेळ सायं.५.७५ वाजेपर्यंत

क) Gen Tagging करण्याकरिता कामाचे ठिकाणी भेट देण्याचा दिनांक :-दि.०६/०६/२०२२ ते १०/०६/२०२२ वेळ सायं.५.७५ वाजेपर्यंत

ड) ई-निविदा उघडण्याचा दिनांक :-दि.२२/०६/२०२२ वेळ १२.०० वाजेपासून

(सदर निविदे सुचनेत काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

१) कंत्राटदाराने Gen Tagging of three site location हे लिफाफा क्र.१ मधुन सादर करने अनिवार्य आहे. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
२) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई-निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
३) सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
४) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाशे इ. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जबाबदार राहतील आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे (Claims) निविदाकारास देय राहणार नाही.

**कार्यकारी अभियंता**
**गोंदिया पाटबंधारे विभाग**
**गोंदिया**

(क्र.जिमाका/गों/जाहि/१२/२०२२)

# शहर स्वच्छ सुंदर,प्लास्टिकमुक्त करण्याच्या अभियानाला सुरुवात



## एकसाथ फाउंडेशन मुंबईचा उपक्रम

**गोंदिया:–** शहर स्वच्छ सुंदर, कचरा आणि प्लास्टिकमुक्त करण्यासाठी पूर्णा पटेल यांच्या पुढाकाराने मुंबई येथील एकसाथ फाऊंडेशनच्या प्रज्ञा कपूर यांच्या नेतृत्वात शुक्रवार, ३ जून रोजी शहरातील मोक्षधाम व डम्पिंग यार्ड परिसरात स्वच्छता मोहीम तर ४ जून रोजी प्लास्टिकमुक्त, शहर अभियान राबवून या अभियानाची सुरूवात करण्यात आली. यात नमाद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि शहरवासी सहभागी झाले होते.

नगर परिषद डम्पिंग यार्ड परिसरात आयोजित या अभियानाच्या शुभारंभाप्रसंगी गोंदिया शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन, प्रज्ञा कपूर, पूर्णा पटेल, निखिल जैन, नगर परिषद मुख्याधिकारी करण चव्हाण, मोक्षधाम सेवा समितीचे देवेश मिश्रा उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी या स्वच्छता मोहीम अभियानात सहभागी होत परिसरातील केरकचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली. शहरातील केरचकऱ्याचे योग्य वर्गीकरण तसेच विल्हेवाट लावून शहर कचरा आणि प्लास्टिकमुक्त करण्यासाठी व लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

### वर्षभर राबविणार जनजागृती अभियान

एकसाथ फाऊंडेशनच्या माध्यमातून शहरात पर्यावरण जनजागृतीसाठी कचरा व प्लास्टिकमुक्त अभियान हे वर्षभर राबविण्यात येणार आहे. यासाठी शहरवासीय आणि शाळा, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार असल्याचे पूर्णा पटेल व प्रज्ञा कपूर यांनी सांगितले.

### कचऱ्याची लावली विल्हेवाट

या स्वच्छता अभियानात वर्षा पटेल, राजेंद्र जैन, प्रज्ञा कपूर, पूर्णा पटेल, निखिल जैन, करण चव्हाण, भूषण गिऱ्हे, गणेश जांगजोड, बंडू सातव, अनिल मेश्राम, योगेंद्र सोलंकी, नितीन जिंदल, तोलाराम मनकानी, लखन सुरणकर, रोहित सोनवाने, नरेन बेलगे, सौरभ रोकडे, नागो बनसोड, नागरतन बनसोड, शिवम घोगरे, समीर तिवारी, मंगेश रंगारी, कान्हा बघेले, दर्पण वानखेडे आदींनी डम्पिंग यार्ड परिसरात स्वच्छता अभियान राबवून केरकचऱ्याचे संकलन करून त्याची विल्हेवाट लावली.

या अभियानात सहभागी होऊन शंभर टक्के सहभाग देण्याची ग्वाही निखिल जैन यांनी दिली. यावेळी प्राचार्य अंजन नायडू, केतन तुरकर, पूजा सेठ, सुनील भालेराव, अखिलेश सेठ, राजेश कापसे, वेनेश्वर पंचबुद्धे, नानू मुदलियार, पुष्पक जसानी, चिराग पटेल, सरला चिखलोंढे, लिकेश चिखलोंढे, आशिक जैन, संकल्प जैन, लखन बहेलिया, सुनील पटले, शैलेश वासनिक, हरीश अग्रवाल, अंकित कुळकणी, अविनाश मेंढे उपस्थित होते.

# पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर करण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्षांचा पुढाकार



**गोंदिया:–** उन्हाळ्यामुळे पाणी पातळी घटत असल्याने गोरेगांव तालुक्यातील मुंडीपार येथील पाणीपुरवठा विहिरीत सारवण तलावाचे पाणी सोडण्याची मागणी गावकऱ्यांनी केली असता जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी तात्काळ पुढाकार घेत घटनास्थळी भेट देत पाहणी केली. तसेच पाणी टंचाई दुर करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत तात्काळ सारवण तलावाचे पाणी नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीत सोडण्याचे आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

सध्या सूर्य आग ओकत असताना जिल्ह्यातील अनेक गावात पाण्याची पातळी घटत चालली आहे. त्यामुळें पाणीटंचाई जाणवत आहे. गोरेगांव तालुक्यातील मुंडीपार येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातुन गावाला पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र नळ पाणीपुरवठा योजनेची विहिर ही कोरडी पडत असल्याने गावात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र गावातीलच नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीच्या वरच्या भागात असलेल्या लघु पाटबंधारे विभागाच्या सरवण तलावात पाणी असल्याने या तलावाचे पाणी नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीत सोडले तर पाणी टंचाई दुर होणार असल्याने ग्रामपंचायतने लघु पाटबंधारे विभागाकडे मंजुरी मागण्यासाठी पत्रव्यवव्हार केला. यासंबंधात जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनाही माहिती देण्यात आली. त्यामुळें आज ३ जून रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी मुंडीपार येथे प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करून अधिकारी व नागरिकांशी संवाद साधत पाणी टंचाई दुर करण्यासाठी पुढाकार घेत सरवण तलावाचे पाणी नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीत सोडण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यावेळी जि.प.सदस्य डॉ. लक्ष्मण भगत, पं.स.सभापती मनोज बोपचे, कार्यकारी अभियंता राउत, उप अभियंता रहांगडाले, माजी उप सभापती सुरेंद्र बिसेन, श्रीमती प्रिती कतलाम जिल्हा परिषद सदस्य, सरपंच सुमेंद्र धमगाये यांच्यासह गावातील इतर पदाधिकारी व नागरीक उपस्थित होते.

# "ती" जमीन वन विभागाची नाहीच

## कुऱ्हाडी येथील गोदाम तोडफोड प्रकरण

**गोंदिया:** गोरेगाव तालुक्यातील कुऱ्हाडी ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या नवटोला येथील गोदामाचे बांधकाम वन विभागाच्या जागेवर असल्याचे सांगत गोरेगाव वनक्षेत्राधिकारी कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदर गोदामाची तोडफोड केली. यावेळी तेथील सरपंच व गावकऱ्यांनी येवून ही जागा वन विभागाची नसून ग्राम पंचायत व गावकऱ्यांची असल्याचे सांगत काम थांबविले. यावेळी वन विभाग व गावकऱ्यांमध्ये चांगलीच जुंपली. दरम्यान वाढता विरोध पाहून वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काढता पाय घेतला. तेव्हा हा प्रकार वर्तमान पत्राच्या माध्यमातून पुढे आला असता जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देत सदर जागा वन विभागाची नसून गावातील सुखलाल येरणे व सर्व ग्रामस्थांच्या नावे असल्याचे तेथील तलाठी कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे आता ही जमीन वनविभागाची नसून कुऱ्हाडी गावातील सर्व ग्रामस्थांची असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नवाटोला हे गाव कुऱ्हाडी ग्रामपंचायत अंतर्गत वनजमिनीवर बसलेले आहे. तिथेच या जमिनीवर गोदामही बांधण्यात आले आहे. दरम्यान, वन विभागाकडून वनजमिनीवर बांधलेले गोदाम हटविण्याची कार्यवाही सुरूकरण्यात आली होती. तर १ जून रोजी गोरेगाव वनविभागाने वनाधिकारी व पोलिसांच्या पथकासह जेसीबीने गोदाम फोडण्याची कार्यवाही सुरू केली. माहिती मिळताच स्थानिक शेतकरी व ग्रामपंचायतीचे सरपंच व इतर लोकांनी जमिनीचा सातबारा दाखवून कारवाई थांबवली. यादरम्यान वनविभागाच्या अधिकाऱ्यांनीही सदर जागेचा सातबारा दाखवत ही जागा वन विभागाची असल्याचे सांगितले. तर दुसरीकडे गावकऱ्यांनीही सातबारा दाखवून ही जागा गावकऱ्यांची असल्याचे सांगत कारवाई बंद केली. त्यामुळे गावात तणावाची स्थिती निर्माण झाली. तर या जमिनीबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, तेथील तलाठी कार्यालयाकडून सदर जागेचा फेरफार करण्यात आला असून ही जमीन गावकऱ्यांची असल्याचे स्पष्ट करण्यात आले असल्याचे सांगितले. त्यामुळे ही जागा वन विभागाची नाही असे स्पष्ट झाले आहे.



### वनक्षेत्राधिकारीविरुद्ध पोलिसात तक्रार

**सदर जागेवर गोदामाचे बांधकाम करण्यात आले असून या गोदामात गावकऱ्यांचे धान ठेवण्यात आलेले आहेत. मात्र, ही वन विभागाची असल्याचे सांगून गोरेगाव वनविभागाचे वनक्षेत्राधिकारी प्रवीण साठवणे यांनी कोणतीही पूर्व माहिती न देता जेसीबीच्या सहाय्याने गोदामाची तोडफोड केली. यावेळी गावकऱ्यांनी धान काढू देण्याची विनंती केली. परंतू त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. ज्यामध्ये शेतकऱ्यांच्या २० ते २५ क्विंटल धानाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे वनक्षेत्राधिकारी प्रवीण साठवणे यांच्यावर कारवाई करण्यात यावी. अशी लेखी तक्रार दादीलाल गौतम, मुन्नीलाल ठाकूर, डिलेश्वर रहांगडाले, अनिल ठाकरे, रवींद्र कटरे यांनी गोरेगाव पोलिस ठाण्यात केली आहे.**

# वनहक्क धारकांचे विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण



**अर्जुनी–मोरगाव :** प्रकाष्ट निष्कसन अधिकारी नवेगावबांध यांच्या कार्यालयाजवळ सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती परसटोला व ग्रामसभा महासंघ यांनी वनहक्क धारकांच्या विविध मागण्यांसाठी ३ जूनपासून आमरण उपोषण सुरुवात केले आहे.

सदर आमरण उपोषण ची सुरुवात क्रांतीसूर्य जणनायक भगवान बिरसा मुंडा आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून केली. या वेळी पंचायत समिती सदस्य आम्रपाली डोंगरवार उपस्थित होते. सदर उपोषणात ग्रामसभा महासंघ अर्जुनी–मोरगावचे अध्यक्ष विनोद किरसान, सचिव आत्माराम वाढगुरे, ग्रामसभा परसटोलाचे रामू कुंभरे, सुदर्शन नेवारे, ग्रामसभा महासंघचे सदस्य दूधराम घरतकर, दिगम्बर मडावी, वसंत कुंभरे, लालसू मडावी, संजय ईश्वर, परसराम कोवासे सहभागी झाले.वनहक्क कायदा २००६ नुसार जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडून प्रकरण क्र.४९० नुसार दि. १२/०९/२०१२ सामूहिक वनहक्कचा दावा मंजूर झाला. वनहक्क धारक म्हणून ग्रामसभा परसटोला कायद्याच्या तरतुदीनुसार ग्रामसभेत सामूहिक वन हक्क व्यवस्थापन समिती गठीत केली. दि. ०३ /०१/२०२२ ला उपवनसंरक्षक गोंदिया यांना लेखी पत्र देऊन शासनाच्या निविदा प्रक्रियेतून ग्रामसभा परसटोला हे वगळण्याकरिता ग्रामसभा महासंघ अर्जुनी–मोरगाव मार्फत दिले. तरीही वन विभागाने ग्रामसभा परसटोला यांना शासन लिलावात शामिल करून लिलाव केला. ग्रामसभा महासंघामार्फत निविदा मागवून अग्रीम तेंदू पाने विक्रीचा अग्रीमेंट केला.

कायद्याच्या सर्व तरतुदी पूर्ण करूनही वन विभाग सहकार्य करण्यास इच्छुक दिसत नाही. वनविभाग हा वनविभागाचे व्यापारी यांचे संगणामताने ग्रामसभाना त्रास देण्याच्या पूर्ण युक्त्या वापरात आणत आहेत. भगवान बिरसा मुंडा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेऊन वनहक्क धारक आपल्या देशाच्या सवोच्च संसदेत पारित अनुसूचित जमातीवर इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) कायदा २००६, नियम २००८, सुधारित नियम २०१२ चे अंमलबजावणी करण्याकरिता पराकोटीचा संघर्ष करण्यास तयार आहेत. असे प्रतिपादन ग्रामसभा महासंघाचे पदाधिकारी व उपोषकर्त्यांनी व्यक्त केले

# ट्रायसिकल मिळताच दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंद



**गोंदिया:** ट्रायसिकल मिळाल्याने माज्या दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसत आहे हा माज्यासाठी अभूतपूर्व क्षण आहे. त्यामुळे माज्यात नवीन ऊर्जा संचारली आहे. या सुखापुढे संपत्ती, ऐश्वर्य, सजावट सारे फिके पडते. मानवसेवा हाच परम धर्म आहे, असे प्रतिपादन आ. विनोद अग्रवाल यांनी केले.

शहरातील अग्रसेन भवनाच्या प्रांगणात आ. अग्रवाल यांच्या वाढदिवसाचा कार्यक्रम ४ जून रोजी संपन्न झाला. यावेळी ३४ दिव्यांगांना स्वयंचलीत तीनचाकी सायकल रिक्षा भेट देण्यात आल्या. त्यावेळी अग्रवाल यांनी वरील भावोद्गार काढले. कार्यक्रमाला भाऊराव उके, मुनेश रहांगडाले, छत्रपाल तुरकर, दीपा चंद्रिकापुरे, मंदा वडवे, वैशाली पांढरे, शैलजा सोनवणे, विनोद बैस, विनोद पाटील, चेतली नागपुरे, पृथ्वीसिंह नागपुरे, हंसराज वासनिक, रतन वासनिक, राजू कात्रे, पप्पू खंडेलवाल, दिलीपसिंग मुंडेले आदी उपस्थित होते.

# बारावीचा निकाल आज; कसा आणि कुठे पहायचा? जाणून घ्या

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (MSBSHSE) लवकरच बारावीचा निकाल बुधवारी ८ जून २०२२ रोजी जाहीर होणार आहे. दुपारी एक वाजता हा निकाल जाहीर केला जाईल. उमेदवारांनी निकालासंबंधित सर्व नवीन माहिती मिळवण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची अधिकृत वेबसाइट तपासत रहावे.

महाराष्ट्र एचएससी निकाल १० जून २०२२ रोजी वेबसाईटवर प्रसिद्ध होणार असे अपेक्षित होते. परंतु निकाल उद्या ८ जून रोजी जाहीर केले जाणार असल्याचे बोर्डाकडून अधिकृत अधिसूचना जारी केले गेले आहे.ङ्याफ वेबसाईटवर लॉग इन करून निकाल पाहू शकतात:

msbshse.co.in
hscresult.mkcl.org
mahresult.nic.in.

# पांगोली नदी पुनरुज्जीवनासाठी प्रस्ताव सादर करा–खा.मेंढे



**गोंदिया:** – शहराजवळून वाहणारी पांगोली नदीच्या पुनरूज्जीवन व संवर्धनाचा लढा जोर धरत आहे. सामाजिक संस्थांच्या वतीने पुढाकार घेतल्याने जनप्रतिनिधीही लक्ष देण्यास बाध्य झाले आहेत. त्यातचकाही दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पांगोली नदी पुनरूज्जीवनासाठी प्रयत्न करणार असल्याचे व्यक्तव्य केले होते.त्यातच आता खासदार सुनिल मेंढे यांनी जिल्हाधिकारी गुंडे यांना पत्र देवून पांगोली नदी पुनरूज्जीवनासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना केल्या आहेत पांगोली नदीचा उगम गोरेगाव तालुक्यातील तेढा ते येथे होवून गोंदिया तालुक्यातील छिपीया येथे बाघनदीत समाहित होतो.

परिसरातील शेतकऱ्यांसाठी जिवनदायी म्हणून एकेकाळी पांगोली नदीची ओळख होती. परंतु सातत्याने होत असलेले दुर्लक्षाने पांगोली नदी धोक्यात आली. नदीच्या अस्तित्व धोक्यात येवून जैवविविधतेचा प्रश्न निर्माण झाला. या गंभीर बाबीकडे शासन, प्रशासनाचे वेळोवेळी लक्ष वेधण्यात आले. परंतु दुर्लक्षच करण्यात आले.

दरम्यान समाजोन्नती बहुउद्देशिय ग्रामीण व शहरी विकास संस्थाच्या नेतृत्वात इतरही सामाजिक संघटना व परिसरातील गावातील शेतकऱ्यांनीसंघटीत होवून लढा उभारला. याची दखल जनप्रतिनिधीपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन यासंदर्भात तत्परता दाखविते की पुन्हा ढिसाळ नियोजनाअभावी हे प्रकरण धुळखात राहणार? याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पांगोली नदीपात्रात राबवले गेले श्रमदान



**गोंदिया:** पांगोली नदी वाचवा अभियानांतर्गत पांगोली नदीत असणाऱ्या प्रदुषणाच्या समस्याकडे जिल्हा प्रशासानाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच पांगोली नदीच्या विकासात्मक समस्यांप्रती नागरीकांत जनजागृती करून लोकचळवळीतून स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे.या मोहिमेंतर्गत आज ५ जून रोजी स्वच्छता अभियान राबवत असतानाच नदीपात्रात राईस मिलसच्या दुषीत पाण्यामुळे एका पक्षाच्या मृत्यू झाल्याचे चित्र समोर आले. स्वयंस्फूतीने पांगोली नदी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत असून नदीपात्रातील जळालेली लाकडे आदी सर्व एकत्र करण्यात आली.

गोंदिया जिल्ह्यातील जीवनदायीनी पण सद्यस्थितीत नामशेष होण्याच्या मार्गावर असणार्या पांगोली नदीच्या अनेक विकासात्मक समस्यांपैकी एक प्रमुख समस्या म्हणजे नदीत नागरीकांद्वारे टाकण्यात येणारे निर्माल्य, घरगूती कचरा, प्लास्टिक व काचेचे तुकडे, पॉलिथीन, मेडिकल वेस्टेज, देवी–देवतांचे फोटो , म्रतदेह जाळल्यानंतर उरलेली लाकूडे आदीचा मोठ्या प्रमाणात समावेश असून यामुळेच नदीपात्र दुषीत झाले आहे.

स्वच्छता मोहीमेत सयोंजक तिर्थराज ते.उके, सरपंच मिलन रामटेककर, एम.ए. ठाकूर, अनिल शरणागत, अशोक बिसेन, अनिल ढोमने, रामनाथ बिसेन, सुकचंद येळे, सुर्यकांत राणे, कमलेश उके, गजानन बघेले, महेशकुमार राहांगडाले, बाल प्रकल्प–अधिकारी विशाल भोसले, विजयकुमार कावळे,वसंत गवळी, संजय कुलकणी, नेत्रदीप (गोल्डी) गावंडे आदी बहुसंख्य शेतकरी, नागरिक व सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींचा सहभाग होता.

# खुल्या प्रवर्गाकरिता डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

## डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

■ गोंदिया जिल्ह्यातील ११ संस्थांमध्ये फक्त तीन लाभार्थी विद्यार्थी ■ खुल्या गटातील विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**गोंदिया:** राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शिक्षण आरक्षणाची उत्पन्न मर्यादा वाढवून देतानाच आदिवासी, शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, मागासवर्गीय तसेच खुला प्रवर्ग अशा समाजातील सर्वच घटकाला शिक्षणासाठी सवलती देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शेतमजुरांच्या मुलांना व्यावसायिक शिक्षणासाठी दरमहा दोन हजार ते तीन हजार रुपये वसतीगृह अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात गेल्या शैक्षणिक सत्रात फक्त तीन विद्यार्थीच लाभार्थी ठरले आहेत. या योजनेचे नियंत्रण जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असून शासकीय तंत्र निकेतन विद्यालयाचे प्राचार्य योजनेचे नोडल अधिकारी आहेत. जिल्ह्यातील आर्थिक दुष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या खाली आहेत. त्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देणे जेणेकरून आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी हे पुढे जाऊन उच्च शिक्षण घेऊ शकतील. पैशाअभावी त्यांचे शिक्षण हे अपूर्ण राहणार नाही. यासाठी ही योजना अमलात आणलेली आहे. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना –** ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी अथवा नोंदणीकृत मजूर आहेत, अशा विद्यार्थ्यांना शासनाने निश्चित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत शासकीय, सरकारी अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय अथवा तंत्रनिकेतनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता मिळेल. महानगरात (मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, औरंगाबाद, नागपूर) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा तीन हजार रुपये (वार्षिक ३० हजार रुपये) तर या शहरांव्यतिरिक्त अन्य शहरात शिक्षण घेणऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा दोन हजार रुपये (वार्षिक २० हजार रुपये) वसतिगृह निर्वाह भत्ता लागू होईल.

या योजनेची अंमलबजावणी २०१६–१७ या शैक्षणिक वर्षांपासूनच करण्यात आली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांचा लाभ राज्यातील सात लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळणार असून राज्य शासनावर ७०० कोटींचा भार पडणार आहे.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना, लाभ व वैशिष्ट्ये**

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना काय आहे?

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सर्व विविध मान्यता प्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना अमलात आलेली आहे. डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना हा मुख्यत: १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमासाठी राबविण्यात येते व योजनेच्या लाभाची रक्कम ही लाभाथी विद्यार्थ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यात थेट जमा केली जाते. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना म्हणजे ज्या विद्यार्थ्याला Higher Education शिक्षण घेताना महाविद्यालयात असलेल्या वसतिगृहात Admission मिळत नाही.

तसेच असे विद्याथी जे स्वत: कुठल्यातरी ठिकाणी जागा भाड्याने घेऊन राहतात अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. ही योजना सर्व आर्थिकदृष्ट्या दुर्लब घटकातील पात्र उमेदवारांसाठी आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी पात्रता–**

अर्जदार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असले पाहिजेत.

अर्जदाराच्या संपूर्ण कुटुंबाचे एकूण उत्पन्न पूर्ण वर्षासाठी २.५ लाख ते ८ लाख रुपयांच्या आत असावे. प्रत्येक अर्जदाराला त्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

ज्या अर्जदारांना या योजनेसाठी अर्ज करायचा आहे, त्यांच्या पालकांनी नोंदणीकृत मजुर म्हणून नोंदणी करावी.

जर कोणत्याही उमेदवाराच्या पालकांकडे फारच कमी किंवा अजिबात शेती नसेल तर अशा कुटुंबातील विद्यार्थी देखील अर्ज करू शकतात, परंतु या परिस्थितीत, अर्जदारास कामगार नोंदणी आणि जमीन नोंदणी प्रमाणपत्र (कामगार नोंदणी प्रमाणपत्र आणि जमीन नोंदणी प्रमाणपत्र) प्राप्त करावे लागेल. (अर्जासोबत सादर करावे लागेल).

पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेसाठी अर्जदाराने निवासी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

ज्या अर्जदारांनी २०१० नंतर CAP प्रवेश घेतला आहे तेच अर्ज करू शकतात, याचा अर्थ फक्त तेच विद्याथी पात्र असतील जे केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश केल्यानंतर जागा Allotment पत्र सादर करण्यास सक्षम असतील.

अर्जदारांना संपूर्ण वर्षात त्यांची उपस्थिती किमान ५०% किंवा त्याहून अधिक असल्याची खात्री करावी लागेल.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह भत्त्यासाठी प्रत्येक घरातून फक्त दोन लाभाथी या पंजाबराव देशमुख वसतिगृह अनुदान योजनेचा लाभ घेऊ शकतील.

केवळ तेच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात, ज्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम किंवा तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला आहे.

सेल्फ फायनान्स सारख्या कोणत्याही खाजगी संस्थेद्वारे ज्यांना संस्था स्तरावर प्रवेश मिळतो, ते या योजनेचे अनुदान मिळण्यास पात्र राहणार नाहीत. बँक खाते नंबर हा आधार नंबरशी लिंक असणे आवश्यक असेल.

हे देखील शिष्यवृत्ती योजनेसारखेच आहे, जर एखाद्या अर्जदाराला हे अनुदान मिळत असेल, तर तो त्या वर्षी इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेसाठी पुन्हा अर्ज करू शकणार नाही. तसे केल्यास त्याला शिष्यवृत्तीसाठी पहिली पसंती, दुसरी पसंती निवडावी लागेल.

एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निर्वाह भत्ता मिळत असल्यास, असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ घेण्यास अपात्र ठरणार आहे.

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रम कालावधी करताच निर्वाहभत्ता देण्यात येईल. तथापि एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला किंवा काही कारणामुळे त्याला वरच्या वर्गात प्रवेश मिळाला नाही, तर त्या वर्षापुरता निर्वाहभत्ता लाभ मिळणार नाही.

या योजनेअंतर्गत रुपये १ लाख रुपये पर्यंत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांकरिता निर्वाह भत्ता लाभ देण्याकरिता संख्येची कोणतीही मर्यादा राहणार नाही. मात्र रुपये १ लाख ते ८ लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक जिल्ह्यासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांची कमीत कमी संख्या ही ५०० इतकीच निश्चित केली गेलेली आहे. त्यापैकी ३३ टक्के इतक्या जागा विद्यार्थिनींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. परंतु पुरेशा विद्यार्थिनी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या जागा त्याच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता उपयोगात आणल्या जातात.

प्रत्येक जिल्ह्यातील कोटा हा प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या संख्येनुसार निश्चित करण्यात येतो.